मुंबई ■ सांगली ■ कोल्हापूर ■ नवे विचार...नवी सुरुवात ■ RNI NO. MAHMAR/2020/79996

दैनिक

# हॅलो प्रभात

■ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ वर्ष : ६ ■ अंक : १५९ ■ गुरुवार, ११ सप्टेंबर २०२५ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४




## संक्षिप्त...

### ‘फार्मसी’चे गणित बिघडले विद्यार्थ्यांचे करिअर धोक्यात

कोल्हापूर : हॅलो प्रभात

फार्मसी प्रवेश प्रक्रियेत यंदा पुन्हा गोंधळ उडाला असून, विद्यार्थ्यांना मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाकडून अद्याप प्रवेश धोरण निश्चित न झाल्याने ही प्रक्रिया डिसेंबरपर्यंत लांबण्याची शक्यता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना एकाच सत्रात वर्षभराचा अभ्यास पूर्ण करून परीक्षेला बसावे लागण्याची वेळ येऊ शकते.

### ‘पीएम किसान’ योजनेचा लाभ आता केवळ पत्नीलाच

सांगली : हॅलो प्रभात


पंतप्रधान किसान सन्मान निधी म्हणजेच पीएम-किसान योजनेत केंद्र सरकारने नवा नियम लागू केला आहे. त्यानुसार पती-पत्नी अशा दोघांच्या नावे शेतजमीन असेल, तर या योजनेचा लाभ आता फक्त पत्नीलाच दिला जाणार आहे. या योजनेंतर्गत सहा हजार रुपये वार्षिक निधी शेतकऱ्यांना दिला जातो. तथापि, केंद्राने नियम कडक करून पत्नीलाच हा लाभ देण्याचा निर्णय घेतला आहे.

### १५५४ शाळांमध्ये हरित क्रांती

कोल्हापूर : हॅलो प्रभात

शालेय पोषण आहारात सकस व ताज्या भाज्यांचा समावेश व्हावा, विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाविषयी आत्मियता निर्माण व्हावी या हेतूने जिल्ह्यातील १,५५४ शाळांमध्ये परसबाग बहरली आहे. प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत विशेष परसबाग स्पर्धा घेतली जात आहे.

# महायुतीला ‘मनभेदा’ची भीती ?




## नेते अस्वस्थ : शिंदे सेना, ठाकरे सेनेचे इच्छूक सैरभैर

### गुडघ्यांस बाशिंग बांधून तयारीत असलेल्या कार्यकर्त्यांमध्ये अस्थिरतेची भावना

सांगली : विशेष प्रतिनिधी

जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक पार्श्वभूमीवर हे युद्ध स्वबळावर लढायचे की महायुतीतून लढायचे याबाबत महायुतीच्या घटक पक्षांमध्ये ’मनभेद’ निर्माण होत आहेत. त्याचप्रमाणे महाविकास आघाडीतही काँग्रेस, राष्ट्रवादी आघाडी करून ठाकरे सेनेला बाजूला ठेवून निवडणूक लढवायची की महाविकास आघाडीतूनच ठाकरे सेनेला कमी जागा देऊन सामावून घ्यायचे याबाबत देखील एकमत नाही, त्यामुळे दोन्ही आघाड्यांमध्ये गुडघ्यांस बाशिंग बांधून निवडणूक लढविण्याच्या तयारीत असलेल्या कार्यकर्त्यांमध्ये अस्थिरतेची भावना निर्माण झाली असून कुंपणावर बसणे त्यांनी पसंत केले असल्याचे सध्यातरी दिसत आहे.


महायुतीतील मनभेदाचा आणि महाविकास आघाडीतील बिघाडीचा फायदा कोणाला होणार ? हे मात्र निकालानंतरच स्पष्ट होणार आहे. भाजपने राज्य पातळीवर घेतलेल्या भूमिकेमुळे महायुतीचे मित्रपक्ष संभ्रमात पडले आहेत. ठाणे जिल्ह्यात भाजपने घुसखोरी करून जी वात पेटवली तिचा धूर सांगली जिल्ह्यापर्यंत येऊन पोहोचला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक राजकीय वातावरण तापवत असताना, जिल्ह्यात महायुतीच्या घटक पक्षांमध्ये निर्माण झालेल्या मनमेदामुळे तसेच महाविकास आघाडीत निर्माण झालेल्या बिघाडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. निवडणूक रिंगणात उतरण्याच्या तयारीत असलेले इच्छुक सैरभैर झाले आहेत. अशा परिस्थितीत विचित्र राजकीय गणिते मांडली जाण्याचा धोका महायुतीसमोर असल्याचा अंदाज राजकीय जाणकारांमधून व्यक्त केला जात आहे

जिल्ह्यात महापालिका, जिल्हा परिषद, नगरपालिका, पंचायत समितीच्या निवडणुकीत महायुती एकसंघपणे राहीली तर महायुतीला यश मिळेल अन्यथा वेगळेच गणित निर्माण होईल असेही जाणकारांतून बोलले जात आहे. भाजपाने लक्षणीय विजय मिळवून महापालिका मध्ये सत्ता स्थापन केली, त्यावेळी एकसंघ राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रीय काँग्रेसचे पानिपत झाले होते.आता राष्ट्रवादीचा एक भाग महायुतीकडे आहे, शिवसेनेचाही एक भाग महायुतीकडे आहे तथापि २०१८ साली मिळालेल्या विजयाची भाजप नेत्यांची नशा उतरलेली नसल्यामुळे विचित्र परिस्थितीकडे राजकीय दिशा देण्याचा प्रयत्न केला जात जात आहे, महापालिका आणि जिल्हा परिषदेमध्ये आपण स्वबळावर सत्तेत येऊ का ? याची चाचणी जरी भाजप नेते करत असले तरी सध्याची परिस्थिती पाहता महायुतीने एकसंघ होऊन लढणे हेच श्रेयस्कर आहे असे जाणकारातून बोलले जात आहे. २०१८ मध्ये बहुमत मिळून तब्बल ४१ जागांवर विजय मिळवून भाजप सत्तेवर आली तरी त्यानंतर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने एकत्रित येऊन बहुमत असतानाही भाजपला धडा शिकवून भाजपमधील सहा नगरसेवक आपल्याकडे घेऊन राष्ट्रवादीचा महापौर बनवला त्याचा विसर तर भाजप नेत्यांना पडलेला नाही ना ? असाही संशय व्यक्त केला जात आहे. सांगली जिल्ह्यात भाजप पुढे जयंतराव पाटलांसारखा विरोधक आहे, याचा विचार भाजप नेत्यांनी आता तरी करावा असे भाजप कार्यकर्त्यांमधूनच बोलले जात आहे.

भाजपने स्वबळाची घोषणा केली तर याचा विचार करूनच अजितदादा राष्ट्रवादी काँग्रेसने तशी परिस्थिती आलीच तर स्वबळावर मैदानात उतरण्याची तयारी ठेवली आहे. तस्वबळामुळे मत विभाजनाचा धक्का बसण्याची शक्यता आहे.

२०१८ च्या महापालिका निवडणूकीत शिवसेनेला एकाही जागेवर विजय मिळवता आला नव्हता, हाच निकष भाजपने जागा वाटपाबाबत लावला तर आणि महाविकास आघाडीतील काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने देखील अशीच भूमिका घेतली तर राजकीय गणिते पूर्णपणे बदलणार आहेत, अनेक पदाधिकारी गुडघ्याला बाशिंग बांधून निवडणूक रिंगणात उतरण्याची तयारी करत आहेत.

काही जागा देऊन ठाकरे सेना आणि शिंदे सेनेला गप्प बसवण्याचा प्रयत्न झाला, तरी त्याचा महायुतीला आणि महाविकास आघाडीला देखील फटका बसणार आहे. अनेक ठिकाणी बंडखोर उमेदवार उभे राहिल्याने मत विभाजन होऊन त्याचा फटका दोन्ही बाजूंना बसणार आहे



७८ सदस्यांच्या सांगली महापालिकेत बहुमतासाठी ४० सदस्यांची गरज आहे. गेल्या निवडणुकीत मिरजकरांनी मिरजेतील २३ वॉर्डपैकी भाजपाला १२ जागांवर विजयी केले होते , तर कुपवाडमधील १२ जागांपैकी ४ जागांवर भाजपला विजय मिळवता आला होता, तर सांगलीतील ४३ जागांपैकी भाजपने २५ जागांवर विजय मिळवला होता.

त्यानंतर बहुमत नसतानाही कुटनीतीचा अवलंब करून भाजपच्या ६ नगरसेवकांना फोडून आघाडीत जादा संख्या असलेल्या काँग्रेसला गप्प बसवून जयंतराव पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचा महापौर महापालिकेत बसवला होता. ही स्थानिक स्वराज्य संस्थेची सांगली जिल्ह्यातील निवडणूक जयंतराव पाटील यांच्या दृष्टिकोनातून प्रतिष्ठेची निवडणूक असून महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका या सर्वच निवडणुकांमध्ये आपले वर्चस्व राहावे यासाठी धूर्त चाली ते आखू शकतात, याचे भाजप नेत्यांना विस्मरण झाल्यासारखे दिसत आहे महायुतीतून निवडणूक लढविण्याचा भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेने निर्णय घेतला तर मतविभाजनाचा धोका टळून गलीतगात्र झालेल्या महाविकास आघाडीच्या असो, अथवा काँग्रेस - राष्ट्रवादी काँग्रेस असो त्यांचे पानिपत करण्याचे आव्हान महायुती सहज पेलू शकेल. याउलट स्वबळावर निवडणूक लढविण्याचा महायुतीने निर्णय घेतला तर मात्र याचा फटका भाजपला मोठ्या प्रमाणात बसण्याची शक्यता आहे.

जयश्री पाटील आणि पृथ्वीराज पाटील हे काँग्रेसचे नेते जरी भाजपात आले असले तरी सांगलीत १३ जागांवर विजय मिळवणारी काँग्रेस आणि पाच जागांवर विजय मिळवणारी राष्ट्रवादी काँग्रेस यांचे माजी नगरसेवक देखील भाजपात जाऊन त्यांनी जरी कमळ हाती घेतले असले तरी त्या प्रभागांमधील मतदार मात्र काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या मागेच ठाम आहे.

त्यामुळे नेते भाजपात गेले तरी विशिष्ट मतदार हा भाजपला साथ देण्याची शक्यता कमीच आहे. एकसंघ शिवसेना असताना महापालिका निवडणूकीत एकाही जागेवर विजय मिळवणे शिवसेनेला जमले नव्हते, हाच निकष स्थानिक स्वराज्य संस्थांच्या महापालिकेसह सर्वच निवडणुकांना लावण्यात आला तर मात्र दोन्ही आघाड्यांपुढे मत विभाजनाचे भूत उभे राहणार आहे.

### घोडावत इन्स्टिट्यूटमध्ये ‘प्रारंभ-२५’ प्रेरणा कार्यक्रम उत्साहात




कोल्हापूर : हॅलो प्रभात

येथील संजय घोडावत इन्स्टिट्यूटमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५- २६ मध्ये डिप्लोमा, डिग्री, आयटीआय व शॉर्ट टर्म कोर्सेस या सर्व विभागांच्या प्रवेशासाठी संपूर्ण महाराष्ट्र राज्यातून विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या पार्श्वभूमीवर पदवी अभियांत्रिकी व शॉर्ट टर्म कोर्सेस प्रारंभ-२५ प्रेरणा कार्यक्रम संजय घोडावत विद्यापीठाचे विश्वस्त, विनायक भोसले यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात पालक प्रतिनिधी व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाली. यावेळी संस्थेचे संचालक डॉ. विराट गिरी, प्रथम वर्ष पदवी विभाग प्रमुख शुभांगी महाडिक, शॉर्ट टर्म कोर्सेस विभाग प्रमुख प्रा. अजय कोंगे, सर्व विभागाचे विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विश्वस्त विनायक भोसले यांनी पालकांना उद्देशून बोलताना म्हणाले प्रत्येक पाल्याची क्षमता ओळखून त्याच्या करिअर घडवण्यासाठी पालकांनी संजय घोडावत शैक्षणिक संकुलावर दाखवलेला विश्वास कौतुकास्पद आहे. या संस्थेतून जागतिक दर्जाचे अभियंते निर्माण होतील याची खात्री आहे. ते पुढे म्हणाले जिद्द, चिकाटी आणि सातत्य या तीन गुणांच्या जोडीने कोणतेही यश मिळवता येते आणि ते टिकवून ठेवता येते. चिकाटी म्हणजे अपयश किंवा नकारांना न घाबरता प्रयत्न करत राहणे आणि संकटे पचवून पुन्हा उभारण्याची क्षमता असणे. सातत्य म्हणजे एकाच कामात नियमितपणे आणि शिस्तबद्धपणे गुंतून राहणे. या तिन्ही गोष्टी मिळून एक व्यक्ती कोणत्याही क्षेत्रात आपले ध्येय गाठू आपण यशस्वी होऊ शकतो. प्रास्ताविक शुभांगी महाडिक यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. शिरोडकर यांनी तर आभार प्रा. डॉ. कांबळे यांनी मानले.

### ‘गोकुळ’ची ६३ वी वार्षिक सभा उत्साहात संपन्न



कोल्हापूर : हॅलो प्रभात

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ (गोकुळ) ची ६३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन नविद मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली कागल येथे झाली. गोकुळची २०२४-२५ अखेर उलाढाल रु.३,९६६ कोटी; दूध संकलन ५८.२० कोटी लिटर, तर दिवाळीपूर्वी उत्पादकांना रु.१३६ कोटींचे वाटप होणार आहे. राज्यातील सर्वाधिक दर देत म्हैस दुधाला सरासरी रु.६०.४८ व गाय दुधाला रु.३६.८४ दिला. सभेत पोटनियम दुरुस्ती, नवे प्रकल्प, मुंबई-पुणे येथील जागा खरेदी, आईस्क्रिम-चीज उत्पादन, वासरू संगोपन केंद्र, सीएनजी पंप उभारणीला मंजुरी मिळाली. यावेळी हसन मुश्रीफ, आमदार सतेज पाटील, माजी आमदार के.पी. पाटील, संजयबाबा घाटगे, विश्वास पाटील, अरुण डोंगळे, शशिकांत पाटील-चुयेकर, बाबासाहेब चौगले, अभिजित तायशेटे, अजित नरके, रणजितसिंह पाटील, अंजना रेडेकर, राजेश पाटील आदी मान्यवरांसह संचालक, अधिकारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ‘झील’चे तायक्कांदो स्पर्धेमध्ये घवघवीत यश

कुपवाड : हॅलो प्रभात



झील इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनियर कॉलेजमध्ये तालुकास्तरीय तायक्कांदो स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये झील इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे विद्यार्थी विविध वयोगटामध्ये प्राविण्य मिळवले. यामध्ये १४ वर्षाखालील मुलांच्या गटाने प्रथम क्रमांक मिळिवला. १४ वर्षाखालील मुलींच्या गटाने प्रथम क्रमांक मिळिवला. १७ वर्षाखालील मुलांच्या गटाने प्रथम क्रमांक मिळिवला.१७ वर्षाखालील मुलींच्या गटाने प्रथम क्रमांक मिळवला. १९ वर्षाखालील मुलांच्या गटाने प्रथम क्रमांक मिळवला. तर मुलींच्या १९ वर्षाखालील गटान विविध वजनी गटात प्रथम क्रमांक मिळवला.

या सर्व खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या संघास महाराष्ट्र राज्य तायक्कांदो सचिव व झील स्कूलचे तायक्कांदो प्रशिक्षक सुरेश चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले.

## आरआयटीमध्ये दर्जेदार शिक्षणाबाबत तडजोड नाही : आ.जयंतराव पाटील

इस्लामपूर : हॅलो प्रभात

राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका, पदवी, एमबीए आणि एमसीए मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभ उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास माजी मंत्री व आ.जयंतराव पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. व्यासपीठावर संस्थेचे सचिव डॉ. आर.डी.सावंत, गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य प्रा.शामराव पाटील, आरआयटीचे संचालक डॉ.पी.व्ही.कडोले, डीन स्टुडन्ट डेव्हलपमेंट डॉ.जुगुळकर, सायन्सेस अँड ह्युमेनिटीज विभाग प्रमुख डॉ.मंडले हे उपस्थित होते. कार्यक्रमास विविध शाखांचे विद्यार्थी व पालक असे एकूण ३५०० च्या जवळपास उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना आ.जयंतराव पाटील यांनी विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण संशोधन, गुणवत्ता आणि सतत प्रगतीचा ध्यास ठेवण्याचे आवाहन


### विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ पालकांशी संवाद




केले. अभियांत्रिकी म्हणजे फक्त समीकरणं सोडवणं नाही, तर आपलं जगण्याचं तंत्र बदलणारी नवनिर्मिती आहे. आर आय टी मध्ये तुम्हाला जागतिक दर्जाच्या सुविधा, अत्याधुनिक प्रयोगशाळा उपलब्ध असणार आहेत. याशिवाय तुमच्या जिज्ञासू वृत्तीला पुस्तके, वर्ग या पलीकडे जाऊन पोषक वातावरण मिळणार आहे. त्यामुळे प्रश्न विचारण्यास कधीही घाबरू नका, शोध घेणं थांबवू नका. आम्हाला खात्री आहे की भविष्यात तुम्ही अभिमानाने म्हणाल की, आर आय टी हे एका छोट्याशा गावात उभे असले तरीही महाराष्ट्रातील सर्वोत्तम महाविद्यालय आहे. अभियांत्रिकी व व्यवस्थापन क्षेत्रामध्ये नेहमीच नाविन्याला वाव असणार आहे त्यामुळे जिद्द आणि चिकाटीने शिक्षण घेऊन मोठे ध्येय प्राप्त करा असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला तर पालकांनीही विद्यार्थ्यांना करिअर घडविण्यामध्ये भक्कम आधार व विश्वास देणे गरजेचे असल्याचे नमूद केले.

गेल्या अनेक वर्षापासून महाविद्यालय हे शैक्षणिक दर्जा, गव्हर्निंग कौन्सिल निर्देशित कार्यप्रणाली याबाबत कुठेही तडजोड करत नाही आणि त्यामुळेच आरआयटी हे आज या नावारूपाला आल्याचे सांगितले. संचालक डॉ.कडोले यांनी आर आय टी च्या स्थापनेपासून ते आजपर्यंतच्या शैक्षणिक वाटचालीवर प्रकाश टाकत, संस्थेच्या एनबीए, नॅक मानांकन, तसेच एम्पॉवर्ड ऑटोनॉमस इन्स्टिट्यूट म्हणून प्राप्त केलेल्या दर्जाबद्दल माहिती दिली. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये विविध शाखांच्या विद्यार्थ्यांचे स्वागत केले. प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया नुकतीच पार पडत आहे.

ज्यामध्ये राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी हे इच्छुक विद्यार्थी आणि पालकांचे नेहमीच प्रथम पसंतीचे महाविद्यालय राहिले आणि याचा परिणाम म्हणून आर आय टी मधील सर्व विद्या शाखांना भरघोस प्रवेशास प्रतिसाद मिळाला त्याबद्दल पालक व विद्यार्थी यांचे अभिनंदन व धन्यवाद दिले. यासोबतच प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालय राबवत असलेल्या विविध शैक्षणिक व शिक्षणपूरक उपक्रमांची माहिती दिली. सदर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ.पी.एन पवार यांनी केले.






# टी २० क्रिकेटचा रणसंग्राम सुरू

आखातातील दुबई आणि अबुधाबी येथे टी २० क्रिकेटचा रणसंग्राम सुरू झाला आहे. आशिया खंडातील क्रिकेटचा राजा कोण हे ठरवण्यासाठी भारतासह आशिया खंडातील आठ देश एकमेकांना भिडणार आहेत. या स्पर्धेत जो संघ विजयी होईल तो आशिया चषकावर स्वतःचे नाव कोरणार आहे. आशिया खंडातील भारत, पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश, अफगाणिस्तान आणि पात्रता फेरीत विजय मिळवून मुख्य स्पर्धेसाठी पात्र ठरलेले हाँगकाँग, संयुक्त अरब अमिराती ( युएई ) आणि ओमान या आठ संघात ही स्पर्धा रंगणार आहे. या स्पर्धेतील पहिला सामना काल अफगाणिस्तान आणि हाँगकाँग यांच्यात झाला तर आज भारत आणि संयुक्त अरब अमिराती (युएई) यांच्यात लढत रंगणार आहे. वास्तविक आशिया चषकाची पात्रता फेरी याआधीच सुरू झाली असून या पात्रता फेरीत हाँगकाँग, संयुक्त अरब अमिराती (युएई) आणि ओमान हे संघ पात्र ठरले असून भारत, पाकिस्तान यांच्या गटात संयुक्त अरब अमिराती (युएई) आणि ओमान हे देश समाविष्ट झाले आहेत.

दुसऱ्या गटात श्रीलंका, बांगलादेश, अफगाणिस्तान आणि हाँगकाँग हे देश आहेत. प्रत्येक गटातून दोन संघ असे एकूण चार संघ सुपर फोरसाठी पात्र ठरतील त्यांच्यात पुन्हा लढत होऊन दोन संघ अंतिम फेरीत पोहचतील. या स्पर्धेत आठ संघ खेळत असले तरी भारत आणि पाकिस्तान या दोन संघांना विजेतेपदासाठी पसंती दिली जात आहे. भारत आणि पाकिस्तान हे या स्पर्धेत प्रबळ दावेदार मानले जात असले तरी तरी श्रीलंका, बांगलादेश आणि अफगाणिस्तान हे संघही चांगली तयारी करुन मैदानात उतरले आहेत त्यामुळे ही स्पर्धा रंगतदार ठरेल यात शंका नाही. भारतासाठी ही स्पर्धा विशेष महत्वाची आहे कारण मागील तीन पैकी दोन स्पर्धेत (२०१६, २०१८,२०२३) भारताने विजेतेपद मिळवले आहे. २०२२ साली श्रीलंकेने आशिया चषकावर नाव कोरले होते. भारताने ही स्पर्धा सर्वाधिक आठ वेळा जिंकली असून यावेळी ही स्पर्धा जिंकून भारत आशिया चषकावर नवव्यांदा नाव कोरेल का ? याकडे क्रिकेट प्रेमींचे लक्ष लागले आहे. भारतीय संघ या स्पर्धेत हॉट फेव्हरेट समजला जातोय कारण भारतीय संघ या स्पर्धेतील सर्वात संतुलित संघ आहे. भारताचे सर्व खेळाडू अनुभवी असून फॉर्मात आहेत. डावखुरा युवा धडाकेबाज फलंदाज अभिषेक शर्मा आणि अनुभवी स्टायलिश फलंदाज शुभमन गिल यांची सलामीची जोडी प्रतिस्पर्धी गोलंदाजांवर तुटून पडली की मधल्या फेरीचे काम हलके होऊ शकते. तिसऱ्या क्रमांकावर युवा डावखुरा फलंदाज तिलक वर्मा येईल तो सध्या बॅडपॅच मधून जात असला तरी त्याची बॅट कधीही तळपू शकेल. तिलक वर्मा जर फॉर्मात आला तर भारताला या स्पर्धेत विजेतेपद मिळवण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. चौथ्या क्रमांकावर कर्णधार सुर्यकुमार यादव येईल तो ही सध्या चांगलाच फॉर्मात असून एकहाती सामना जिंकून देण्यात तो पटाईत आहे. त्याच्यानंतर विकेट किपर आणि स्फोटक फलंदाज संजू सॅमसन येईल. ज्या दिवशी संजू सॅमसनची बॅट चालते त्यादिवशी भारत विजयी होतो. त्यानंतर रिंकू सिंग किंवा शिवम दुबे येतील ते फिनिशरची भूमिका निभावतील.

कदाचित जितेश शर्मा यालाही या क्रमांकावर संधी मिळू शकते तो ही चांगला फिनिशर आहे. त्यानंतर अनुभवी हार्दिक पांड्या हा फलंदाजीस येईल. हार्दिक पांड्या हा अनुभवी अष्टपैलू खेळाडू संघात असल्याने संघाचे संतुलन वाढले आहे. वेगवान गोलंदाजीची धुरा अनुभवी जसप्रीत बुमरा आणि युवा अर्षदीप सिंग तसेच हर्षित राणा सांभाळतील तर फिरकी गोलंदाजीची धुरा अनुभवी अक्षर पटेल आणि कुलदीप यादव यांच्यावर आहे. त्यांना मिस्ट्री फिरकी गोलंदाज वरुण चक्रवर्तीची साथ लाभेल. वरुण चक्रवर्ती हा जगातील सध्याचा सर्वात घातक फिरकी गोलंदाज समजला जातो. त्याची फिरकी भल्या भल्या फलंदाजांनाही कळत नाही त्याचा दिवस असला तर प्रतिस्पर्धी फलंदाजांची फळी कोलमडून पडेल. अक्षर पटेल हा फिरकी गोलंदाज फलंदाजीही करतो. म्हणजे तो ही अष्टपैलू खेळाडू आहे. संघात निवड झालेले हे सर्व खेळाडू टी २० मधील जाणकार खेळाडू आहेत विशेष म्हणजे या खेळाडूंना दुबई आणि अबुधाबीमध्ये खेळण्याचा चांगला अनुभव आहे. दुबई आणि अबुधाबी मध्ये भारतीय संघ अनेक आंतरराष्ट्रीय सामने खेळला आहे. याच ठिकाणी एकदा आयपीएलही रंगली होती आणि त्यात यातील काही खेळाडूंनी भाग घेतला होता त्यामुळे तेथील खेळपट्टी आणि हवामानाशी भारतीय खेळाडू परिचित आहेत. त्यामुळे भारतच या स्पर्धेचा प्रबळ दावेदार मानला जात आहे. भारताला या स्पर्धेत जर कोणी आव्हान देऊ शकेल तर तो पाकिस्तान. भारत आणि पाकिस्तान यांच्यात १४ सप्टेंबर रोजी लढत होणार असून या लढतीकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे.

नेहमीप्रमाणे भारत आणि पाकिस्तान या पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांमध्ये होणारा हा सामना रंगतदार होईल यात शंका नाही. ऑपरेशन सिन्दुर नंतर पहिल्यांदाच हे दोन्ही संघ आमने सामने येत असल्याने या सामन्याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. अलीकडच्या काळात पाकिस्तानची कामगिरी चांगली झालेली नाही. त्यांचा माजी कर्णधार बाबर आझम आणि मोहम्मद रिझवान नावाचा त्यांचा विकेट किपर बॅट्समनला संघातून वगळले आहे फॉर्म हरपल्याने त्यांना संघातून बाहेर वगळण्यात आले आहे. त्यांच्या संघात कर्णधारासह अनेक खेळाडू नवखे आहेत. त्यांचा संघ नवखा असला तरी भारताविरुद्ध ते जीव तोडून खेळतात हा त्यांचा इतिहास आहे. पाकिस्तानी संघात नवीन खेळाडू असले तरी त्या संघास कमी लेखण्याची चूक भारतीय संघ करणार नाही.

भारताविरुद्ध चांगली कामगिरी करण्याचा प्रयत्न ते नेहमीच करत असतात. त्यांच्याकडे दर्जेदार वेगवान गोलंदाज आहे. भारतीय फलंदाजांना बाद करण्यासाठी ते जीवाचे रान करतील यात शंका नाही त्यामुळेच हा सामना रंगतदार ठरेल. या स्पर्धेत भारत पाकिस्तान एकदा नव्हे तर तीनदा आमने सामने येतील अशी शक्यता आहे. १४ सप्टेंबर नंतर सुपर फोर मध्येही हे दोन्ही संघ एकमेकांना भिडतील आणि तिथे चांगली कामगिरी केली तर कदाचित अंतिम फेरीतही दोन्ही संघ समोरासमोर येतील. भारत या स्पर्धेतील प्रबळ दावेदार असला तरी टी २० स्पर्धेत कोण विजयी ठरेल हे कोणीही छातीठोकपणे सांगू शकत नाही मात्र मागील कामगिरीचा आणि सध्या असलेल्या फॉर्मचा विचार करता भारतच या स्पर्धेत अजिंक्य ठरेल आणि आशिया चषकावर नवव्यांदा नाव कोरेल असा विश्वास १५० कोटी देशवासियांना आहे.

# समस्यांच्या विळख्यात स्व.राजीव गांधी रुग्णालय ?

## दवाखाना कोणासाठी? रुग्णासाठी की,दारूड्यासाठी ■ पालिकेचे रुग्णालय अखेर गॅसवर

**पुणे : सोमनाथ साळुंके**

ससून रुग्णालयाच्या पार्श्वभूमीवर येरवडा-खडकी मार्गावर येरवडा येथे सर्वसामान्य नागरिकांच्या सेवेसाठी पालिका प्रशासनाच्या वतीने उभारण्यात आलेले स्व.राजीव गांधी रुग्णालय विविध समस्यांच्या विळख्यात अडकून येथे सर्रासपणे बेवड्यांनी वाहनतळाचा वापर दारू पिण्यासाठी करत असल्याने असलेले रुग्णालय हे रुग्णांच्या सेवेसाठी की,दारूड्यासाठी? उभारले आहे.असा संतप्त सवाल रुग्णांच्या नातेवाईकांकडून करण्यात येत आहे.

पुणे-नगर महामार्गावर वसलेल्या येरवडा परिसराकडे ऐतिहासिक वारसा लाभलेले उपनगर म्हणून पाहिले जात आहे.त्यातच शहराच्या हाकेच्या अंतरावर वसलेल्या उपनगरात कामानिमित्त राज्यासह परराज्यातील नागरिक कामानिमित्त जरी स्थायिक झाले असले तरी पण बहुतांश प्रमाणात झोपडपट्टीचा भाग प्रामुख्याने परिसरात दिसून येत आहे.त्यामुळे सर्वसामान्य कुटुंबातील नागरिकांना खाजगी रुग्णालयाचा खर्च परवडणारा नसल्याने अशा कुटुंबातील नागरिकांच्या सेवेसाठी आरोग्य प्रशासनाच्या वतीने ब्रिटिश राजवटीत पर्णकुटी चौकात शासकीय रुग्णालय उभारण्यात आले आहे.मात्र यापूर्वी रुग्णालयाचा असणारा परिसर रुग्णासाठी अपुरा पडू लागल्याने अंदाजे सात ते आठ वर्षापूर्वी टोलेजंग इमारत उभारून ससून रुग्णालयाच्या पार्श्वभूमीवर संबंधित रुग्णालय उभारून त्यास स्व.राजीव गांधी रुग्णालय असे नामकरण करण्यात आले



आहे.

त्यामुळे विविध रुग्णांच्या आजारावर या ठिकाणी उपचार होत असल्याने येथे रुग्णालयात नेहमीच रुग्णासह त्यांच्या नातेवाईकांची वर्दळ दिसून येत असताना येथे येणाऱ्या महिला रुग्णांना अनेक अडचणींना सामोरे जाण्याची वेळ येत आहे.इमारतीच्या तळमजल्यावर टोलेजंग असे वाहनतळ उभारण्यात आले आहे. मात्र येथील वाहनाचा गैरवापर स्थानिक नागरिक करत असून येथे वाहनतळात रुग्णांची वाहने लावण्याऐवजी स्थानिक नागरिक वाहनतळाचा वापर वाहने लावण्यास करत असल्याने रुग्णांना भेटण्यासाठी येणाऱ्या नातेवाईकांना वाहन तळात जागा शिल्लक राहत नसल्याने नाईलाजास्तव वाहने मुख्य रस्त्यावर वाहने लावण्याची वेळ येऊन याचा त्रास विनाकारण रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांना सहन करावा लागत आहे.रुग्णालयात प्रामुख्याने महिलांची वर्दळ दिसून येते.मात्र येथे पालिका सुरक्षा रक्षक विभागाकडून कर्मचारी नेमण्यात आले असताना देखील अनेक दारुडे हे वाहन तळाचा वापर सर्रासपणे दारू पिण्यासाठी करत असल्याने परिसरात दारूच्या बाटल्या ह्या अस्ताव्यस्त पडून रुग्णालयात येणाऱ्या महिलांना दारुड्यांचा नेहमीच त्रास सहन करावा लागत आहे.यामुळे पुन्हा येथील रुग्णालयात येणाऱ्या महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.नेहमीच होणाऱ्या या प्रकारामुळे उभारण्यात आलेले रुग्णालय हे रुग्णांच्या सेवेसाठी उभारण्यात आले आहे की,दारूचा आस्वाद घेणाऱ्या बेवड्यासाठी हा मुख्य प्रश्न नागरिकांना सतावत आहे.

> समाजातील गोरगरीब व गरजूवंत रुग्णासाठी हे रुग्णालय उभारण्यात आले असताना रुग्णालयाच्या आवारातच जर अनेक दारुडे हे दारू पिण्याचा मनसोक्त आनंद घेत आहे.रुग्णालयाच्या समोरच पर्णकुटी पोलिस चौकी असताना देखील दारुड्यांचे पिण्याचे धाडस होत असेल तर येथे येणाऱ्या महिला खरोखरच सुरक्षित आहेत का?हा प्रश्न उपस्थित होत आहे.
>
> **– अनवर पठाण**
> **प्रदेश उपाध्यक्ष : भाजप**
> **अल्पसंख्यांक मोर्चा**

यापूर्वी विविध कारणांनी हे रुग्णालय चर्चेत आले असताना सध्या येथे दारू पिणाऱ्या तळीरामामुळे दवाखान्याची चर्चा होऊ लागली आहे.तर येरवडा परिसरात साफसफाई करणारे कर्मचारी कचऱ्याची वाहने पार्किंग ठिकाणीच लावत आहेत. त्यामुळे कचरा गाड्यांच्या दुर्गंधीचा सामना देखील रुग्णासह कर्मचाऱ्यांना सहन करावा लागत आहे.

त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनून रुग्णालयाच्या आवारात मोकाट कुत्र्यांचा वावर जास्त प्रमाणात दिसून येत आहे.त्यामुळे एखाद्या दिवशी भटक्या कुत्र्यांनी रुग्णास चावा घेतला तर यास जबाबदार कोण?असा संतप्त सवाल रुग्णांकडून करण्यात येत आहे.याबरोबरच पालिका पाणीपुरवठा विभागाच्या वतीने रुग्णांची अडचण लक्षात घेऊन या ठिकाणी पाणीपुरवठा करण्यात आला आहे.

मात्र येथील काही नागरिक पिण्याच्या पाण्याचा गैरवापर करून वाहने धुण्यासाठी करत आहेत. एकीकडे शहरातील विविध भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी टाहो फोडण्याची वेळ येत असताना देखील दुसरीकडे मात्र रुग्णालयातच पिण्याच्या पाण्याचा गैरवापर होण्याचे प्रमाण दिवसेदिवस वाढत असल्याने या ठिकाणी कोणत्याही अधिकाऱ्याचा वचक पाण्याचा गैरवापर करणाऱ्यावर राहिला नसल्याचे यामुळे स्पष्ट होत आहे. वाहन तळाच्या आवारात आल्यावर येथील अनेक भिंती ह्या गुटख्याच्या पिचकाऱ्यांनी रंगल्या आहेत.त्यामुळे असलेले रुग्णालय हे कचऱ्याबरोबरच गुटख्याचे आगार बनले आहे.एकीकडे गोरगरीब कुटुंबातील रुग्णांना सुरळीतपणे आरोग्यसेवा मिळावी या हेतून आरोग्य प्रशासन विविध उपाययोजना राबवत असताना दुसरीकडे मात्र नेहमीच समस्यांच्या विळख्यात अडकलेल्या या रुग्णालयात महिलांची सुरक्षा अबाधित राहण्यासाठी रुग्णालयाच्या वतीने काय?सुविधा पुरविण्यात आलेले नसल्याचे दिसून येत आहे.त्यामुळे या ठिकाणी नेमण्यात आलेले सुरक्षा रक्षक देखील असून नसल्यासारखे आहे. त्यामुळे भविष्यात होणाऱ्या अनुचित घटना टाळण्यासाठी रुग्णालय व परिसरात उपाययोजना करण्याची मागणी रुग्णासह त्यांच्या नातेवाईकांकडून करण्यात येत आहे.

यासंदर्भात रुग्णालयाचे वरिष्ठ अधिकारी डॉ.बागडे यांच्याशी प्रत्यक्ष भेट घेतली असता त्यांनी तात्काळ घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन येथे कार्यरत असलेले सुरक्षा रक्षकांना समज दिली आहे.

> सध्या महिलांवरील वाढते अत्याचार रोखण्यासाठी पालिका प्रशासनाने योग्य पाऊल उचलणे गरजेचे आहे.
>
> **– माया ओव्हाळ**
> **सामाजिक कार्यकर्त्या**

## भाजपचा पदाधिकारी पदग्रहण सोहळा संपन्न

**पुणे : हॅलो प्रभात**



भारतीय जनता पार्टीच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष प्रदीपदादा कंद, कार्यकारिणी सदस्य डॉ. रामशेठ गावडे पाटील, खेड तालुका अध्यक्ष शांताराम भोसले, आळंदी ग्रामीण मंडळ अध्यक्ष अमोल दादा वीरकर तसेच पांडुरंग ठाकूर,बापू थिटे,संगीता फफाळ, स्वामी बवले, किरण येळवंडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडल अध्यक्ष अमोल वीरकर यांनी केले. त्यांनी यावेळी भारतीय जनता पार्टी घरोघरी पोहोचविण्याचे आवाहन केले व येणाऱ्या निवडणुकांमध्ये एकजुटीने काम करून प्रचंड बहुमताने विजय मिळवण्याचा विश्वास व्यक्त केला.भारतीय जनता पक्ष राज्य परिषद सदस्य डॉ. राम गावडे पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू मानून कार्य करण्याचे आवाहन केले.

## गाडगीळ शाळेत विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

**पुणे : हॅलो प्रभात**

मनेकचंद नेमचंद विश्वस्त संस्था मुंबई. यांचे विश्वस्त किरीट सुंदरलाल शेठ यांच्या ७५ व्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त या संस्थेचे सीएमए संपत झरे यांच्या अध्यक्षतेखाली मनपा शाळा क्रमांक ११८ मुलांची विश्रांतवाडी या शाळेतील मुला मुलींनाअतिशय चांगल्या प्रतीचे २०० शारीरिक प्रशिक्षणसाठीचे गणवेश वाटप करण्यात आले. पालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण



घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांची आर्थिक परिस्थिती ही हलाकीची असते.

यामुळे विद्यार्थ्यांना पालक गणवेश घेण्यासाठी असमर्थता दर्शवितात, हे लक्षात घेऊन त्यांना चांगल्या प्रतीचे पीटी गणवेश देण्याचा उपक्रम पार पडला.

शिवाय शाळेच्या कामासाठी प्रिंटर सुद्धा यांच्यामार्फत देण्यात आला. यावेळी येरवडा विभागातील सामाजिक कार्यकर्ते माननीय विनोद पवार,आदिती झरे, रोहन दाभाडे, विवेकानंद माळवीनकर, आदी मान्यवर उपस्थित होते.

शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका सुनीता जाधव, नितीन वाणी, संजीवनी सोनार, प्रदीप गवळी, स्वाती लोहखरे, सुरेखा डफफळ, कल्याणी गाडे, सुमया शेख, रेखा फेगसे, पूजा घोगरे शाळेच्या वतीने उपस्थित होते. प्रास्ताविक नितीन वाणी यांनी केले. सुरेखा डफफळ यांनी आभार मानले.

## खावडा सौर प्रकल्पासाठी विक्रम सोलारला एलअँडटीकडून ऑर्डर

**कोलकाता : वृत्तसेवा**

विक्रम सोलार या भारतातील आघाडीच्या सोलार पीव्ही मॉड्यूल उत्पादक कंपनीने एलअँडटी कन्स्ट्रक्शनकडून ३३६ मेगावॅट उच्च-कार्यक्षम सोलार मॉड्यूल्सची मोठी ऑर्डर मिळाल्याची घोषणा केली आहे. हे मॉड्यूल्स गुजरातमधील खावडामध्ये तैनात करण्यात येतील, जेथे कंपनीने आधीच महत्त्वपूर्ण योगदान दिले आहेत.या ऑर्डरचा भाग म्हणून विक्रम सोलार एन-टाइप तंत्रज्ञानावर आधारित आपल्या प्रगती हायपरसोल जी१२आर मॉड्यूलसचा पुरवठा करेल. विक्रम सोलारचे हे नवीन मॉड्यूल सुधारित बायफेसिलिटी, उच्च तापमानामध्ये सर्वोत्तम कार्यक्षमता आणि किमान वार्षिक ऱ्हास (≤0.४ टक्के) दाखवते. वापरण्यात येणारे जी१२आर मॉड्यूल्स बॅलन्स-ऑफ-सिस्टम (बीओएस) कार्यक्षमता वाढवतील आणि लेव्हलाइज्ड कॉस्ट ऑफ एनर्जी (एलसीओई) कमी करण्यास मदत करतील, ज्यामुळे ते अधिक किफायतशीर आणि सहजसाध्य होतील. महत्त्वाकांक्षी लक्ष्य व खावडा रिन्यूएबल एनर्जी पार्क सारख्या मोठ्या प्रमाणातील प्रकल्पांसह गुजरात भारताच्या नवीकरणीय ऊर्जा परिवर्तनात आघाडीवर आहे आणि सौर क्षमता तैनात करण्यात जागतिक मापदंड स्थापित करत आहे. तसेच यामधून तंत्रज्ञान नाविन्यता, मोठ्या प्रमाणात क्षमता आणि सातत्यपूर्ण अंमलबजावणीच्या माध्यमातून भारताच्या शुद्ध ऊर्जा परिवर्तनाला पुढे घेऊन जाण्याप्रती विक्रम सोलारची कटिबद्धता देखील दिसून येते.

यावेळी विक्रम सोलारचे अध्यक्ष ज्ञानेश चौधरी म्हणाले, 'आम्हाला या महत्त्वपूर्ण प्रकल्पासाठी योगदान देण्याचा आनंद होत आहे. या प्रांतामध्ये सौर ऊर्जेसाठी मोठी क्षमता आहे आणि हा प्रकल्प ती संधी आत्मसात करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका साकारेल.

## साडेतीन वर्षांच्या मुलाच्या फुफ्फुसातून एलईडी बल्ब काढण्यात डॉक्टरांना यश

**मुंबई : हॅलो प्रभात**



एका दुर्मिळ व असाधारण वैद्यकीय केसमध्ये जसलोक हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरमधील डॉक्टरांनी साडेतीन वर्षांच्या मुलाच्या फुफ्फुसात अडकलेला धातूचा एलईडी बल्ब यशस्वीरित्या काढला, ज्यामुळे तीन महिन्यांपासून त्याला सतत खोकला आणि श्वसनाचा होत असलेला त्रास अखेर दूर झाला. राहुल सुरुवातीला निदान झालेल्या न्यूमोनिया आजाराने ग्रस्त होता आणि अँटीबायोटिक्सचे अनेक औषधोपचार करण्यात आले. डॉ. विमेश राजपूत आणि डॉ. दिव्य प्रभात यांनी मिनी थोरॅकोटॉमी केली, ज्यामुळे खेळण्यांच्या गाडीतून गिळलेला एलईडी बल्ब यशस्वीरित्या काढून टाकण्यात आला आणि मुलाच्या फुफ्फुसांचे कार्य पूर्ववत करण्यात आले. अॅनेस्थेसियोलॉजी सल्लागार डॉ. अनुराग जैन यांनी या शस्त्रक्रियेला मोठे सहकार्य केले.

## आरे कॉलनीत कॅन्सर जनजागृती अभियानाचे आयोजन

**मुंबई : हॅलो प्रभात**



आरे कॉलनीतील सेक्टर १३ येथे देबाब्रता मिताली ऑरो फाऊंडेशन आणि टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या प्रिव्हेंटिव्ह ऑन्कॉलॉजी विभागाच्या संयुक्त विद्यमाने कॅन्सर जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा मुख्य उद्देश महिलांना कॅन्सर प्रतिबंध, लवकर निदान आणि आरोग्यसेवा संसाधनांविषयी जागरूक करून त्यांना सशक्त बनविणे हा होता.

## कोल्हापूरमध्ये एचईएक्स स्टोअर सुरू

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**



हेटीच इंडियाने कोल्हापूरमधील पहिले हेटिच एक्सक्लुझिव्ह स्टोअर सुरू केले असून, कंपनीने देशभरातील ग्राहकांना आकर्षक इंटिरियर अनुभव देण्यासाठी आपले स्टोअर्स अधिक विस्तारले आहेत. या स्टोअरचे उद्घाटन हेटीच इंडियाचे वरिष्ठ प्रतिनिधी जितीन अग्रवाल आणि फ्रँचायझी पार्टनर विनय पटेल यांच्या उपस्थित रिबन कापून करण्यात आले.

## एचडीएफसी बँकेचा वार्षिक शॉपिंग बोनान्झा

**मुंबई : हॅलो प्रभात**

भारतातील आघाडीची खासगी बँक एचडीएफसी बँकेने आपल्या वार्षिक फेस्टिव्ह ट्रीट्स २०२५ मोहिमेची घोषणा केली आहे. या मोहिमेमुळे देशातील सणासुदीच्या खरेदीची सुरुवात झाली आहे. या देशभर लागू असलेल्या शॉपिंग बोनान्झामध्ये ग्राहकांना क्रेडिट कार्ड्स, लोन, पेझॅप आणि इझीईएमआयवर १०,००० हून अधिक आकर्षक ऑफर्स मिळणार आहेत. त्यामुळे ग्राहकांसाठी सणासुदीची खरेदी अधिक परवडणारी आणि फायदेशीर ठरणार आहे.

## नवीन स्टोअरसह ज्वेलबॉक्सचा मुंबईत विस्तार

**मुंबई : हॅलो प्रभात**



ज्वेलबॉक्स या भारतातील नव्या युगाच्या लॅब-ग्रोन डायमंड ज्वेलरी ब्रँडने ऑगस्टमध्ये बोरिवलीत यशस्वीरित्या स्टोअर सुरू केल्यानंतर इनऑर्बिट मॉल, वाशी येथे आपल्या मुंबईतील दुसऱ्या स्टोअरचे उद्घाटन केल्याचे जाहीर केले आहे. ५०० चौ. फूट क्षेत्राचे हे नवीन दुकान आधुनिक, मिनिमलिस्ट आणि अनुभव-प्रेरित डिझाईन प्रदान करते, ज्यामुळे लॅब-ग्रोन डायमंड्सचा शोध घेणे अकर्षिक आणि सुलभ होते.

## टीव्हीएस मोटर कंपनीतर्फे टीव्हीएस एनटॉर्क १५० लाँच

**मुंबई : हॅलो प्रभात**



टीव्हीएस मोटर कंपनी, दुचाकी आणि तीन चाकी क्षेत्रातील आघाडीच्या कंपनीने टीव्हीएस एनटॉर्क १५० ही भारतातील सर्वात वेगवान हायपर स्पोर्ट स्कूटर लाँच केली आहे. १४९.७cc रेस- ट्युन्ड इंजिन आणि स्टेल्थ एयरक्राफ्ट डिझाइनपासून प्रेरित असलेल्या या स्कूटरमध्ये उच्च कामगिरी, स्पोर्टी लूक आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान यांचा मेळ घालण्यात आला आहे. नव्या पिढीच्या रायडर्ससाठी खास बनवण्यात आलेली ही स्कूटर १,१९,००० रुपयांच्या प्रारंभिक किंमतीत उपलब्ध करण्यात आली आहे. ही स्कूटर नवा आयकॉन बनवण्यासाठी सज्ज आहे. यातील MULTIPOINT® प्रोजेक्टर हेडलॅम्प्स, एयरोडायनॅमिक विंगलेट्स, कलर्ड अलॉय व्हील्स, सिग्नेचर मफलर नोट या स्कूटरची रेसिंगची क्षमता दर्शवणारी आहे. अलेक्सा, स्मार्टवॉच इंटिग्रेशन, लाइव्ह इंटिग्रेशन, नॅव्हिगेशन आणि इतर ओटीए अपडेट्ससह ५०+ स्मार्ट वैशिष्ट्यांचा समावेश असलेल्या या हाय- रेझ टीएफटी क्लस्टरमुळे ही स्कूटर या श्रेणीतील सर्वात आधुनिक ठरली आहे.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली – ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात,** कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली- ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.

■ **सांगली मुख्य कार्यालय :** ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३०

■ **सांगली शहर संपर्क :** ९०२१६५१९७६ ■ **कोल्हापूर कार्यालय :** एस ९४६, GF-७, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२

■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)

■ व्यवस्थापकीय संपादक : संजय भिडे ■ सल्लागार संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर



## संमिश्र

### प्रज्वल ढवळेची शालेय तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड



**पेठवडगाव : हॅलो प्रभात**

येथील छत्रपती शिवाजी विद्यानिकेतन व ज्युनि. कॉलेज व दिशा इंग्लिश मेडियम स्कूल या प्रशालेच्या प्रज्वल ढवळे यांची कोल्हापूर येथे होणाऱ्या शालेय विभागीय तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड झाली. क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,कोल्हापूर यांच्या वतीने कोल्हापूर येथे घेण्यात आलेल्या शालेय जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत प्रज्वल ढवळे याने ७५ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक मिळवल्याने त्याची शालेय विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.या यशस्वी विद्यार्थ्यास प्रशालेचे संस्थापक अध्यक्ष व मुख्याध्यापक राजेंद्र माने,संस्थेच्या सचिवा सुवर्णा माने,खजानिस बापूसो माने यांचे प्रोत्साहन व क्रीडा प्रशिक्षक राहुल देवकुळे,जिमखाना प्रमुख व शालेय व्यवस्थापन प्रमुख आनंद पाटील यांचे मार्गदर्शन लाभले तसेच मिलिटरी इन्स्ट्रक्टर मेजर राजेंद्र पाटील,कॅप्टन सुरेश आडसूळ, सर्व विभाग प्रमुख,शिक्षक,प्रशिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.


### अंशराज शिंदे क्रीडारत्न पुरस्काराने सन्मानित



**अर्जुनवाड : हॅलो प्रभात**

अर्जुनवाड (ता.शिरोळ) येथील अंशराज शिंदे खेळाडूने स्केटिंग या खेळात विविध ठिकाणी झालेल्या स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली असल्यामुळे हॉकी लिजंड पद्मभूषण मेजर ध्यानचंद क्रीडा पुरस्कार समिती व कालीरमण फाउंडेशन इंडिया यांच्या वतीने मेजर ध्यानचंद महाराष्ट्र क्रीडा रत्न २०२५ पुरस्कार मिळाला आहे. स्केटिंगमध्ये नियमित सराव, प्रचंड मेहनत आणि चिकाटी यांचा उत्तम संगम साधत त्याने स्वतःला सिद्ध करून दाखवले.स्केटिंग स्पर्धेत अंशराज याने आजपर्यंत लंडन बुक ऑफ द वर्ल्ड रेकॉर्ड, भारत बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, युनायटेड स्टेट ऑफ अमेरिका बुक ऑफ द वर्ल्ड रेकॉर्ड, गिनीज इंडियन बुक ऑफ द रेकॉर्ड, यु एन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड या स्पर्धेत यश संपादन केले आहे. आतापर्यंत मुंबई, सोलापूर, पुणे, विटा, कोल्हापूर, जयसिंगपूर, कराडसह कर्नाटक महाराष्ट्र राज्यातील विविध स्पर्धेत हे यश संपादन केले आहे. परिपूर्ण संतुलन, वेग आणि कौशल्य यामुळे हॉकी लीजंड पद्मभूषण मेजर ध्यानचंद क्रीडा पुरस्कार समिती आणि कालीरमण फाउंडेशन इंडिया आयोजक मंडळाकडून त्याला पुरस्कार व गौरवचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. अंशराज शिंदे याला तेज रोलर स्केटिंग अॅकॅडमी जयसिंगपूर तेजस पाटील( आतंरराष्ट्रीय स्केटिंग प्रशिक्षक )शिरोळ वडील अभयसिंह शिंदे यांचे महत्त्वपूर्ण योगदान मिळाले आहे

### विठ्ठल रखुमाई महिला संस्थेचा दोन कोटीं ठेवी पार : संजिवनी कांबळे



**कोतोली : हॅलो प्रभात**

श्री विठ्ठल रखुमाई ग्रामीण महिला पतसंस्था मर्या., कोतोलीची पहिली वार्षिक सभा चेअरमन सौ. संजिवनी कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाली. अल्पावधीतच संस्थेने दोन कोटी रुपयांच्या ठेवींवर मजल मारली असून, संस्थेकडे सध्या १ कोटी ९० लाख ठेवी, १ कोटी २२ लाख कर्जवाटप, ५८ लाखांची गुंतवणूक, तर दोन कोटी रुपयांचे खेळते भांडवल आहे. संस्थेला ७५ हजार रुपयांचा नफा झाल्याचे कांबळे यांनी सांगितले. संस्थेच्या प्रगतीसाठी संस्थापक बळवंत पाटील मास्तर यांच्या मार्गदर्शनामुळे संस्थेला नावारूप प्राप्त झाले असल्याचा उल्लेखही यावेळी करण्यात आला.या सभेत सचिव पुनम लव्हटे यांनी अहवाल वाचला. संचालिका सुनंदा पाटील, भारती यादव, उषा जाधव, सुनिता रेडेकर, सावित्री पाटील, रुपाली रेडेकर, रेखा पाटील, सविता माने, छाया रेडेकर, सावित्री शिवाजी पाटील, प्रविणा सागर खोत, शोभा दिनकर पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने सभासद, कर्मचारी व पदाधिकारी उपस्थित होते.

### पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला ग्रामपंचायतींचा प्रतिसाद

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

पंचगंगा व इतर जलस्त्रोत प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी जिल्हा परिषदेच्या पर्यावरणपूरक गणेशोत्सव उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. यावर्षी तब्बल २ लाख ९१ हजार गणेशमूर्ती जलस्त्रोतांऐवजी पर्यायी व्यवस्थेत विसर्जित करण्यात आल्या. जिल्ह्यातील ५४ ग्रामपंचायतींनी एक गाव एक गणपती ही संकल्पना राबवली, तर १३ गावांनी मातीच्या मूर्तींची परंपरा जपत पर्यावरणपूरक भूमिका बजावली. या गावांचा लवकरच गौरव करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. यांनी दिली.

## निशिकांतदादा युथ फौंडेशन विजेत्यांना सन्मानित करणार

**ईश्वरपुर : हॅलो प्रभात**

निशिकांत दादा युथ फौंडेशनच्या वतीने गौरी गणपती सजावट व रेकॉर्डेड वक्तृत्व स्पर्धा २०२५ आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धांना उरुण- ईश्वरपूर शहरातून मोठा प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेतील विजेत्यांना दि. १४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वा. उरुण-ईश्वरपूर शहरातील निर्मला सांस्कृतिक हॉल या ठिकाणी बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. याचबरोबर खास महिलांसाठी मुंबई येथील बॉलीवूड महिला कलाकारांचा डान्स शो व खेळ पैठणीचा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.



या कार्यक्रमास प्रकाश शिक्षण फौंडेशनच्या संचालिका सौ. सुनिता निशिकांत भोसले-पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार असल्याची माहिती निशिकांत दादा युथ फौंडेशनचे अक्षय पाटील व अजित पाटील यांनी दिली.गौरी गणपती सजावट या स्पर्धेमध्ये उरुण - ईश्वरपूर शहरातील १५७ घरगुती गौरी गणपती सजावट केलेल्या महिलांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेतील अनुक्रमे पाच विजेत्यांना फ्रिज , आटा चक्की, टी.व्ही, ओव्हन , मिक्सर अशी बक्षिसे देऊन गौरवण्यात येणार आहे. याचबरोबर रेकॉर्डेड वक्तृत्व स्पर्धेतील अनुक्रमे दोन विजेत्यांना सायकल व मोबाईल टॅब बक्षीस म्हणून देऊन गौरवण्यात येणार आहे. उपस्थित महिलांमधून लकी ड्रॉ मधून ड्रेसिंग टेबल, स्टॅण्ड फॅन, इलेक्ट्रिक शेगडी व सहा विजेत्या महिलांना एक ग्रॅम गोल्ड ज्वेलरी अशा बक्षिसांचा वर्षाव होणार आहे.

याचबरोबर उपस्थित महिलांना प्रकाश शिक्षण फौंडेशनच्या संचालिका सौ. सुनिता निशिकांत भोसले-पाटील यांच्याकडून वाण वाटप व श्वेता गोल्ड यांच्याकडून हम खास गिफ्ट देण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे सांगली जिल्हा अध्यक्ष निशिकांत भोसले - पाटील, माजी उपनगराध्यक्ष जयवंत पाटील, संजय कोरे, माजी नगरसेवक वैभव पवार, मनीषा पाटील, प्रतिभा शिंदे , यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## नामनिर्देशन व दिशादर्शक फलक बसविण्याची मागणी

**पिंपरी-चिंचवड : हॅलो प्रभात**

नवी सांगवी येथील नाम निर्देशक व दिशादर्शक फलक बसविण्याबाबत ओम साई फाउंडेशनच्यावतीने अध्यक्ष संजय मराठे यांच्याकडून चिंचवड विधानसभेचे आ.शंकरभाऊ जगताप व वार्ड ३१ नवी सांगवीचे उपअभियंता प्रशांत कोतकर यांना मागणीचे निवेदन देण्यात आले.



प्रभाग ३१ नवी सांगवी मध्ये पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी अंतर्गत खूप मोठ्या प्रमाणात स्मार्ट सिटीचे चांगले मोठे सिमेंटचे रस्ते रस्त्याच्या बाजूला सुंदर अशा पदपथकाचे कामे झाले आहेत,

पण नामनिर्देशक व दिशादर्शक फलक नसल्याने नागरिकांना ठराविक त्या ठिकाणी पोहोचण्यासाठी अडचणी येतात. तसेच तेथील परिसराचा किंवा नगराचा निश्चित असा बोध होत नाही, त्यामुळे नागरिकांना अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास येत असल्यामुळे नागरीकांच्षा सोयीसाठी ही मागणी करण्यात आली आहे.

सांगवी फाटा-नर्मदा चौक ते कासारवाडी हा मुंबई - पुणे महामार्ग व सांगवी फाटा - कृष्णा चौक ते नाशिक फाटा हा पुणे - मुंबई महामार्ग या दोन मुख्य महामार्गांना जोडणारे रस्ते प्रभाग क्रमांक ३१ मधून जातात .

तसेच पिंपळे गुरव - नवी सांगवी मध्ये मोठी बाजारपेठ असल्याने या रस्त्यावरून हजारो नागरिक कामानिमित्त रोजच मोठ्या प्रमाणात ये - जा असते,

पण या रस्त्याला दिशादर्शक फलक नसल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे.

त्यामुळे परीसरातील सदर ठिकाणी मोठे दिशादर्शक कमानीचे फलक बसविण्यात यावे अशी मागणी चिंचवड विधानसभेचे आ.शंकर जगताप यांना तर 'ह' क्षेत्रीय कार्यालयाचे उपअभियंता कोतकर यांना ही नगरांचे नामनिर्देशक फलक बसून देण्याबाबत लेखी निवेदन दिले आहे.

त्याप्रसंगी ओम साई फाउंडेशनचे संजय मराठे,प्रभाग अध्यक्ष सखाराम रेडेकर,आय. टी.इंजिनीयर रमेश चौधरी, सामाजिक कार्यकर्ते महेंद्र राजापुरे,तौफिक सय्यद,प्रवीण भोसले आदींच्या सह्या या मागणी पत्रावर आहेत.

### अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत द्या : रिपब्लिकन सेनेची मागणी



**गांधीनगर : हॅलो प्रभात**

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीमुळे झाल्यामुळे करवीर तालुक्यातील प्रयाग चिखली, वडगणे, केर्ली, सोनतळी, बहिरेश्वर, आरे व गड मुडशिंगी, आंबेवाडी, वळीवडे या करवीर तालुक्यामध्ये पुराच्या पाण्यामुळे व अतिवृष्टी झालेल्या गावासह शेतामध्ये पाणी साचून मोठ्या प्रमाणात रब्बी पिकांचे नुकसान झाले आहे. नदीकाठच्या गावांमधील पुराच्या पाण्याने वेडा घातल्यामुळे पुराचे पाण्यामध्ये ऊस बुडाला असून अतिवृष्टीमुळे घराची पडझड ही झाली आहे. शेतीच्या मिळणाऱ्या उत्पन्नापासून शेतकरी राजा आपला उदरनिर्वाह करत असून झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी हातबल झाला आहे. शासनाने तात्काळ पंचनामे करून मागील वर्षाच्या तुलनेत कमी करण्यात आलेले अनुदानित रक्कम वाढवून शेतकरी व पीडितांना त्वरित रक्कम बँकेच्या खात्यात जमा करण्यात याव्यात या मागणीसाठी नायब तहसीलदार निवेदन देण्यात आले. यावेळी भीमराव गोंधळी, तानाजी काळे, अर्जुन गोधळी, संतोष कांबळे, अर्जुन कांबळे, विकास बाचणे, संदीप गोंधळी कोषाध्यक्ष,शिवाजी कांबळे करवीर संघटक, रमेश जाधव, रविराज पोवार, बाळू पोवार, रावसाहेब चव्हाण, अनिल चव्हाण, आनंद चव्हाण, रवी चव्हाण, भीमराव माने उपस्थित होते.

## निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेची आढावा बैठक

### इच्छुकांना तयारीला लागण्याच्या सुचना

**नातेपुते : हॅलो प्रभात**

उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार उपनेते माजी आमदार शहाजी पाटील, संर्पक प्रमुख महेश साठे, जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांचे मार्गदर्शनाखाली माळशिरस तालुक्यातील मौजे अकलूज येथील शासकीय विश्रामगृह येथे संर्पक प्रमुख महेश साठे यांच्या प्रमुख उपस्थितीत व तालुका प्रमुख सतीश सपकाळ यांचे अध्यतेखाली शिवसेना शिंदे गटाची आढावा बैठक पार पडली. दरम्यान विविध विषयांवर चर्चा करत असताना आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व निवडणुकांबाबत देखील चर्चा विनिमय करण्यात आली. सदर बैठकीत शिवसेना माळशिरस तालुका यांच्या वतीने लवकरच रोजगार महामेळाव्याचे आयोजन



करण्यात येणार असून या रोजगार मेळाव्याच्या निमित्ताने तालुक्यातील बेरोजगार तरुणांना तसेच महिलांच्या हाताला काम करण्याची मोठी संधी शिवसेना उपलब्ध करून देणार आहे

. तसेच लघुउद्योगांसाठी सहकार्य या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून करण्यात येणार असल्याची देखील चर्चा या बैठकीत करण्यात आली, तसेच माळशिरस तालुक्यातील शेकडो महिलांना शिलाई मशीनचे देखील वाटप करण्यात येणार असल्याची माहिती तालुका प्रमुख सतीश सपकाळ यांनी दिली. या बैठकीसाठी माळशिरस तालुका शिवसेना नेते एकनाथ कर्चे, शिवसेना ओबीसी महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष भीमराव भुसणर, जिल्हा उपप्रमुख दादासाहेब लोखंडे, जिल्हा उपप्रमुख दीपक खंडागळे, तालुका कार्यप्रमुख महादेव तुपसौंदर, तालुका उपप्रमुख सुनील साठे,रणजीत गायकवाड ,तालुका प्रवक्ते प्रा शहाजी पारसे,ड योगेश लोखंडे, अकलूज शहर प्रमुख महेश पवार,रावसाहेब कोकाटे,सह तालुक्यातील शिवसैनिक व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

### 'एआरडीएस' आजार ठरतोय प्राणघातक

**पुणे : हॅलो प्रभात**

'अॅक्यूट रेस्पिरेटरी डिस्ट्रेस सिंड्रोम' अर्थात 'एआरडीएस' हे नाव फारसे परिचित नसले, तरी हा आजार झाल्यास तो प्राणघातक ठरू शकतो. न्यूमोनियासारख्या गंभीर संसर्गानंतर होणाऱ्या या स्थितीत फुफ्फुसांमध्ये झपाट्याने सूज आणि द्रवाचा साठा निर्माण होतो आणि श्वास घेणे जवळपास अशक्य होते.जागतिक आरोग्य संघटनेनुसार, 'न्यूमोनिया' हा पाच वर्षांखालील मुलांचा सर्वांत मोठा संसर्गजन्य घातक आजार आहे. क्वचित प्रसंगी तो'एआरडीएस'मध्ये परिवर्तित होतो. जगभरातील पेडियाट्रिक इंटेन्सिव्ह केअर युनिटमध्ये दाखल होणाऱ्या रुग्णांपैकी सुमारे दोन टक्के रुग्ण 'एआरडीएस'चे असतात.

### देवल क्लबमध्ये राज्यस्तरीय खुल्या अभिवाचन स्पर्धा

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

गायन समाज देवल क्लब तर्फे प्रतिवर्षीप्रमाणे या वर्षीही कंस्ट्रोसिस करंडक नटश्रेष्ठ बाबुराव पेंढारकर स्मृती राज्यस्तरीय खुली अभिवाचन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. येत्या २० आणि २१ सप्टेंबर २०२५ रोजी ही स्पर्धा देवल क्लबच्या सभागृहात संपन्न होईल. मराठी भाषेतील कोणतीही संवादात्मक गद्य संहिता यामध्ये सादर करता येईल. १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत खासबागेतील देवल क्लबच्या कार्यालयात नावनोंदणी करता येईल. स्पर्धकांनी ७७०९४७११०३ या क्रमांकावर अधिक माहितीसाठी संपर्क साधावा. स्पर्धेमध्ये स्वलिखित अथवा पूर्वप्रकाशित कोणतीही गद्य संहिता वाचता येईल, किमान २ आणि कमाल ८ जणांच्या संघाला भाग घेता य़ेईल, संहिता बघून वाचायची आहे. एका संस्थेकडून एकपेक्षा जास्त संघ येऊ शकतात, परंतु एक वाचक दोन संघात भाग घेऊ शकणार नाही. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी वयाची कोणतीही अट नाही. महाराष्ट्रासह कर्नाटक आणि गोवा येथील संघांनाही यात भाग घेता य़ेईल. या स्पर्धेचे पहिले बक्षीस ५,००० रु असून इतरही अनेक आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत.

## ताकारी योजनेवरील शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढा उभारणार : नारायण वाघमोडे

**देवराष्ट्रे : संदेश जाधव**

सध्या ताकारी योजनेचे पाणी बंदिस्त पाईपलाईन द्वारे शेतकऱ्यांना देण्याचे शासनाचे नियोजन असून तसे केल्यास बरेच नवीन प्रश्न तयार होणार आहेत याबाबत शेतकरी नेते नारायण वाघमोडे यांनी शेतकऱ्यांसह ताकारी उपसा सिंचन योजनेच्या कार्यकारी अभियंता मा. प्रज्ञा पाटील यांना भेटून विविध प्रश्नावार सविस्तर चर्चा करून, पाणी वाटप नियोजन व सध्या सुरु असलेली बंदिस्त पाईपलाईनची कामे याबाबत शेतकऱ्यांच्या मागण्याबाबत निवेदन दिले.

सध्या चालू असलेले बंदिस्त पाईपलाईनचे काम हे कंत्राटदाराच्या मनमानी पद्धतीने चालू आहे. त्यामुळे वेळोवेळी आराखडा बदलला

### कार्यकारी अभियंता यांना विविध मागण्यांचे निवेदन



जात आहे. बंदिस्त पाईपलाईन मूळे परक्युलेशन होणार नाही त्यामुळे जमिनीची पाणीपातळी कमी होणार आहे.

यांचबरोबर प्रत्येक शेतकऱ्याला पाणी मिळण्यासाठी, छोटे ओढे,पाझर तलाव भरले जातील अशा वितरिका तयार करणे गरजेचे आहे. वर्षात कितीवेळा आणि कोणत्या कालावधीत पाणी आवर्तन देणार याची माहिती हंगामाच्या सुरवातीला ग्रामपंचायत मधे प्रसिद्ध करावी. वेळेत पाणी मिळाले नाही तर शेतकऱ्यांना पाणीपट्टी माफ करावी.

अशा विविध प्रश्नाबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा अन्यथा बंदिस्त पाईपलाइनला विरोध करून शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी तीव्र लढा उभारणार असल्याचे शेतकरी नेते नारायण वाघमोडे यांनी सांगितले.

## देव आहे या संकल्पनेमुळेच जग सुरक्षित : प्रा.बारस्कर

**कवठेमहांकाळ : हॅलो प्रभात**

जगात विविध देशात व विविध धर्मात देवाची विविध रुपे सांगितली जातात पण देव आहे आणि तो पाप,पुण्याची नक्कीच दखल घेऊन त्याचे प्राचित्य देतो ही आदरयुक्त भीती असल्यानेच आज जगात शांतता नांदते आणि जग सुरक्षित आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्रा.एम.एम.बारस्कर यांनी घाटनांद्रे (ता.कवठेमहांकाळ) येथील सर्वोदय विद्यालयात शिक्षकदिना निमित्ताने घेण्यात आलेल्या कार्यक्रमात केले. अध्यक्षस्थांनी संस्थेचे उपाध्यक्ष नारायण शिंदे होते. यावेळी प्रा.बारस्कर पुढे म्हणाले की, जेथे बुध्दीची हद्द संपते तेथूनच श्रध्देची हद्द सुरू होते. देवाच्या भक्तीने मानवाच्या मनात सात्विक भाव निर्माण होतो की ज्यामध्ये पवित्रता असते. आजच्या शिक्षण व्यवस्थेच्या मर्मावर बोट ठेवताना ते पुढे म्हणाले की आजची शिक्षण व्यवस्था ही उच्चशिक्षित व सुशिक्षित पिढी घडवत आहे,



पण सुसंस्कृत नाही,त्यामुळेच आईचा खून,एकतर्फी प्रेमातून खून,बलात्कार,आई-वडील वृद्धाश्रमात यांसारख्या घटना घडतात व पाहावयास मिळतात. हे पाहीले की मन अगदी सुन्न होते.

त्यामुळे यावर आईवडीलांची सेवा व देवाचे नामस्मरण हा एकमेव मात्रा असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी तिसंगी येथील सिध्दनाथ हायस्कूलचे माजी मुख्याध्यापक विठ्ठल पवार यांनी आपल्या भाषणात शिक्षक,विद्यार्थी व समाज यांच्यातील ऋणानुबंध अगदी थोडक्यात पण मजेशीर भाषेत विशद केला त्याला उपस्थितांनी चांगलीच दाद दिली. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. स्वागत प्रास्ताविक लक्ष्मण लवटे यांनी केले तर आभार दिलीप खाडे यांनी मानले. संपुर्ण कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचलन हे कु. श्रावणी शिंदे व कु.श्रुती जाधव या दोन विद्यार्थ्यांनीनी केले.यावेळी संचालक कुंदन पवार,मुख्याध्यापक बी.एस. शिंदे, शिक्षक सर्वश्री साधना धेंडे-कांबळे,प्रकाश वाघमोडे, लक्ष्मण लवटे,जयसिंग बोबडे,भारत काळे,दिलीप खाडे,जयानंद स्वामी, शोभा पाटील, सचिन पाटीलसह पालक,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भागीरथी पतसंस्थेचे कामकाज डिजिटल करण्यासाठी प्रयत्नशिल

## अरूंधती महाडिक : पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत




**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

महिला सक्षमीकरण आणि आर्थिक स्वावलंबनाच्या उद्दे-शाने स्थापन केलेल्या भागीरथी नागरी सहकारी पतसंस्थेची दुसरी वार्षिक सर्वसाधारण सभा, खेळीमेळीत पार पडली. जनतेमध्ये विश्वासार्हता वाढल्याने, संस्थेची आर्थिक प्रगती वेगाने सुरू आहे. येत्या काही दिवसात पतसंस्थेचे कामकाज डिजिटल आणि ऑनलाईन स्वरूपात करण्यासाठी आपण प्रयत्नशिल आहोत, अशी माहिती संस्थेच्या अध्यक्षा सौ. अरूंधती महाडिक यांनी दिली.

भागीरथी संस्थेच्या माध्यमातून गेल्या १५ वर्षाहून अधिक काळ अरूंधती महाडिक, महिला सक्षमीकरणाचं काम करत आहेत. त्यानंतर गेल्या वर्षी भागीरथी नागरी सहकारी पतसंस्थेची स्थापना करण्यात आली. खासदार धनंजय महाडिक यांच्या प्रोत्साहना-तून स्थापन झालेल्या भागीरथी पतसंस्थेने अल्पावधीत जनमनसात वेगळे स्थान निर्माण केले आहे. संस्थेचे सध्या ३ हजार २०० सभासद आहेत. तर २ कोटी रूपयांपेक्षा अधिक ठेवी आहेत. अहवाल सालात पतसंस्थेकडून ६४ लाख रूपयांचे कर्ज वाटप करण्यात आले असून, खेळते भाग भांडवल ४१ लाख २५ हजार रुपये आहे. नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात, भागीरथी पतसंस्थेला चांगला ढोबळ नफा झाला आहे.सर्वसाधारण सभा अरूंधती महाडिक यांच्या अध्यक्षतेखाली आणि तज्ञ संचालक पृथ्वीराज महाडिक, विश्वराज महाडिक, वैष्णवी महाडिक, अंजली महाडिक यांच्यासह सर्व संचालक आणि सभासदांच्या उपस्थितीमध्ये पार पडली. प्रारंभी पतसंस्थेचे अंतर्गत लेखापरिक्षक शिवराज मगर यांनी, आर्थिक ताळेबंद जाहीर केला. शिर्डी येथे नुकत्याच झालेल्या आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेत, अरूंधती महाडिक आणि पृथ्वीराज महाडिक सहभागी झाले होते. या परिषदेत जगभरातील सहकार क्षेत्रातील घडामोडींची माहिती सौ. महाडिक यांनी घेतली आहे. त्याबद्दल अरूंधती महाडिक यांनी सविस्तर माहिती दिली. यावेळी सभासदांच्यावतीनं सर्व संचालकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी स्मिता माने, प्राजक्ता घोरपडे, अर्पिता जाधव, प्रियांका अपराध, पुष्पा पोवार, भाग्यश्री शेटके, मंगल बनस-ोडे यांच्यासह सभासद उपस्थित होते.



## चंपाबेन शाळेत 'शिक्षक दिन' उत्साहात

**तासगाव : हॅलो प्रभात**

तासगावच्या चंपाबेन वाडीलाल ज्ञानमंदिर शाळेमध्ये ङ्कशिक्षक दिनङ्क म्हणजे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचा जन्म दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमा पूजनाने झाली त्यानंतर सामूहिक प्रार्थना संपन्न झाली. यावेळी शाळ-ेतील शिक्षकांचा व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा शालेय विद्यार्थ्यांनी सत्कार केला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती आपली कृतज्ञता व्यक्त केली. मुख्याध्यापक श्री.जोग यांनी विद्यार्थ्यांना व सहकारी शिक्षकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इ.१०वी ब मधील विद्या-र्थी अब्दुल पठाण यांनी तर सूत्रसंचालन नितीन जोशी यांनी केले. श्री.स्वामी यांच्या आभार प्रदर्शनाने शिक्षक दिन कार्यक्रमाची सांगता झाली.

## फिजिओथेरपी सप्ताह समाजोपयोगी उपक्रमांनी संपन्न




**मिरज : हॅलो प्रभात**

गुलाबराव पाटील मेमोरियल ट्रस्टच्या प्रमिलादेवी पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, मिरज येथे १ ते ८ सप्टेंबर २०२५ दरम्यान फिजिओथेरपी सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. यामध्ये डॉ. योगेश एडगे यांनी 'हेल्दी एजिंग' विषयावर प्रभावी मार्गदर्शन केले आणि पोलीस उपनिरीक्षक सौ. उषा गायकवाड यांचे ङ्कसायबर क्राईम फसवणूक व प्रतिबंधङ्क या विषयावरील मार्गदर्शनं लक्षवेधी ठरले.

या सप्ताहात वृद्ध सेवा श्रम कुपवाड येथे फळेवाटप व आर-ोग्य तपासणी शिबिर सर्वांच्या मनात घर करून गेले. तसेच महाविद्यालयाच्या फिजिओथेरपी ओपीडीमध्ये मोफत फिजिओ-थेरपी शिबिर, महिलांचे आरोग्य तपासणी व फिजिकल फिटनेस शिबिर घेण्यात आले. याचा लाभ अनेक स्त्री पुरुष रुग्णांनी घेतला.

समारोप प्रसंगी बक्षीस वितरणासह राममंदिर ते आमराई गार्डन, सांगली येथून फिजिओ-थेरपी जनजागृती रॅली काढण्यात आली व नाटिकेचे सादरीकरण झाले.

याला सांगलीकरांनी भरभरुन प्रतिसाद दिला. संस्थेचे संस्थापक चेअरमन पृथ्वीराज पाटील, ट्रस्टी विरेंद्रसिंह पाटील यांच्या प्रोत्साहनाबद्दल, कॅम्पस कोऑर्डिनेटर डॉ. सतीश पाटील यांच्या सहकार्याबद्दल व प्राचार्या डॉ. आकांक्षा जोशी यांच्या मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

## शहरातील वार्ड क्र.१० मध्ये पुन्हा पाणीटंचाई

**सांगली : हॅलो प्रभात**

सांगली शहरा-तील वार्ड क्र.१० मधील जासुस मळा,मिराहौसिंग सोसायटी,आप्पासाहेब पाटील नगर, टिंबर एरिया, भिमनगर तसेच राजर्षी शाहू कॉलनी(नवीन वसाहत) आदी परिसरात कमी दाबाने पाणी पुरवठा करणेत येत आहे.



वारंवार तक्रार करुन देखील प्रशासनाकडून दखल घेतली जात नाही. त्यामुळे नागरीकांकडून तीव्र संताप व्यक्त होत असून कृष्णा नदीमध्ये मुबलक पाणी उपलब्ध असताना देखील शहरात अपुरा पाणी पुरवठा होत असलेने मानव निर्मित पाणीटंचाई त्वरीत दूर करावी. तसेच जाणीवपूर्वक पाणीटंचाई निर्माण केली जात असल्याची भावना निर्माण होत असुन यास जबाबदार असणा-यांची सखोल चौकशी करणेत यावी व त्वरीत पाणीटंचाई दूर करावी अशी मागणी माजी नगरसेवक जगन्नाथ ठोकळे यांनी केली असून तक्रार केल्यानंतर पाणी पुरवठा सुरळीत केला जातो याचीही चौकशी व्हावी अशी मागणीही जगन्नाथ ठोकळे यांनी केली आहे.

## पी एम किसान योजनेतील लाभार्थ्यांना योजनेचा लाभ द्यावा



### मनसेच्या वतीने कृषी अधिकाऱ्यांना निवेदन

**देवराष्ट्रे : हॅलो प्रभात**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर येण-ारे हप्ते थांबले बाबत तात्काळ कार्यवाही करून पी एम किसानचा वंचित शेतकऱ्यांना लाभ देणे करता मनसेच्या वतीने कडेगाव तालुका कृषी अधिकारी संभाजी पटकुरे यांना निवेदन देण्यात आले. तालुक्यातील बऱ्याच शेतकऱ्यांच्या खात्यावर प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा हप्ता जमा झालेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे.

तसेच रासायनिक खतांचे भाव प्रचंड वाढले असून शेती करणे शेतकऱ्यांसाठी कठीण झाले आहे. उत्पादन खर्चही निघत नाही. या पार्श्वभूमीवर पीएम किसान योजनेचे हप्ते शेतकऱ्यांच्या खात्यावर नियमित जमा होणे अत्यावश्यक आहे.

पात्र शेतकऱ्यांची तपासणी करून त्यांचे हप्ते तातडीने सुरू करावेत. अर्ज करताना कागदपत्र साईजची मर्यादा वाढवावी. पात्र शेतकऱ्यांना कोणत्याही पूर्वसूचना न देता वंचित ठेवू नये.

जर या बाबींकडे तातडीने लक्ष देण्यात आले नाही तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने शेतकऱ्यांच्या न्यायासाठी कृषी विभागासमोर आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला. यावेळी विशाल शिंदे, सतीश येताळ, अनिल माने, संदीप मोहिते यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## हळ्ळी हायस्कूलमध्ये शिक्षकांचा गौरव सोहळा



**उमदी : सतिष अजमाने**

हळ्ळी (ता.जत) येथे भारत शिक्षण संस्था संचलित श्री.अल्लम प्रभू हायस्कूलमध्ये शिक्षक दिनाच्या निमित्ताने शिक्षकांचा गौरव करण्यात आला. यावेळी दहावीच्या विद्यार्थ्यांकडून विद्यार्थी शिक्षक म्हणुन दिवसभरात शाळा सुरू ठेवण्यात आली. दुपारनंतर डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करुन विद्यार्थी मनोगत व मान्यवरांचे भाषण कार्यक्रम झाले. यानिमित्ताने मुख्याध्यापक रमेश सुंट्याळ यांनी गुरू व शिष्य यांचे नाते कसं असावं या बद्दल महिती सांगितले. यावेळी गावाचे सरपंच रवी मेडिदार, चेअरमन सिद्धराम खवेकर, ज्येष्ठ नेते यशवंतराव पाटील, बाबुराव नागोंड, हणमंत खवेकर, बाबुराव जंगलगी, सुभाष हविनाळ, खवेकर, श्री.कन्नूर, श्री.चिक्कलगी, भिमराव नागोंड, प्राथमिक शाळा समिति अध्यक्ष आण्णाराय हविनाळ यांनी उपस्थीत राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

## डॉ.बाळासाहेब चोपडे यांचा सत्कार संपन्न

**सांगली : हॅलो प्रभात**

सांगलीचे प्रख्यात स्त्रीरोग तज्ञ मा. डॉ. बाळासाहेब शामराव चोपडे यांचा त्यांच्या वैद्यकीय क्षेत्रातील सामाजिक कार्याबद्दल विशेष सन्मान प्रशासनाच्या वतीने करण्यात आला होता. या सन्मानाच्या प्रित्यर्थ तीर्थंकर एज्युकेशन सोसायटीतर्फे विशेष सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.



सन १९९५ पासून सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत डॉ. चोपडे यांनी गेली ३० वर्षे सातत्याने सेवा देत आतापर्यंत तब्बल १.५ लाखांहून अधिक बिनटाका स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया मोफत केल्या आहेत. ग्रामीण व शहरी भागातील महिलांना सुरक्षित व निस्वार्थ आरोग्यसेवा पुरविण्याचे त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे.

याप्रसंगी संस्थेचे चेअरमन रावसाहेब पाटील यांनी डॉ. चोपडे यांच्या तीन दशकांच्या वैद्यकीय सेवेचा आढावा घेत समाजोपयोगी कार्याचे कौतुक केले.

सत्काराला उत्तर देताना डॉ. चोपडे म्हणाले, समाजसेवा हेच माझ्या आयुष्याचे ध्येय आहे. रुग्णांच्या चेहऱ्यावरचे समाधान हीच माझी खरी संपत्ती आहे. आगामी काळातही मी अशाच पद्धतीने समाजोपयोगी कार्यात सक्रिय राहीन,असे त्यांनी नमूद केले. हा सत्कार सोहळा तीर्थंकर एज्युकेशन सोसायटीचे प्राचार्य डॉ. डी. डी. चौगुले सर यांच्या हस्ते संपन्न झाला.

याप्रसंगी संस्थेचे संचालक सर्वश्री मिलिंद भिलवडे, महा-वीर चौगुले, अजित फराटे तसेच प्राचार्य डॉ. किरण वाडकर उपस्थित होते.



## राजेंद्र पिसे यांना राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार

**नातेपुते : हॅलो प्रभात**

येथील राजेंद्र नंदकुमार पिसे यांना राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक गौरव पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात आला आहे. शंकरराव पाटील चॅरिटेबल ट्रस्ट संचलित एक्सेड सायन्स व वाणिज्य महाविद्यालय, बारामती आणि लातूर सायन्स अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिनानिमित्त हा पुरस्कार देण्यात आला.

श्री.पिसे यांनी नातेपुते परिसरातील विद्यार्थ्यांमध्ये वाचन-लेखनाची आवड निर्माण केली तसेच शिक्षणाबद्दल ओढ जागवली. त्यांच्या क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी, विद्यार्थ्यांमध्ये प्रगल्भता निर्माण करण्यासाठी केलेले प्रयत्न आणि सामाजिक जाणिवा वाढविणारे उपक्रम या सर्वांचा सन्मान म्हणून त्यांची निवड करण्यात आली.

## 'श्रीगणेशा आरोग्याचा'उपक्रमातून ७.४ लाख नागरिकांची आरोग्य तपासणी

**मुंबई : हॅलो प्रभात**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या ङ्कश्रीगणेशा आरोग्याचाङ्क या विशेष उपक्रमाला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने आणि विविध आरोग्य संस्थांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे लाखो नागरिकांपर्यंत मोफत आरोग्यसेवेचा लाभ पोहोचला.




राज्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये २८ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर दरम्यान १२,६५५ आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांतून ७ लाख ४०७३ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान आजार आढळलेल्या १८,८०० रुग्णांना तज्ज्ञांकडे पुढील उपचाराकरिता पाठविण्यात आले. तसेच, नागरिकांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून सामाजिक जबाबदारी पार पाडली असून २३६ शिबिरांतून एकूण १६,७९८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या अभियानात मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, महात्मा फुले जन आरोग्य योजना, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये तसेच धर्मादाय रुग्णालयांशी संलग्न तज्ज्ञ डॉक्टर व आरोग्य कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

राज्यभरातील मोठ्या संख्येतील गणेश मंडळांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त सहकार्य करून लोकाभिमुख उपक्रम अधिक परिणामकारक करण्यास हातभार लावला.

## घरगुती गणेश मूर्ती सजावट स्पर्धा उत्साहात

**शिराळा : नारायण घोडे-पाटील**

वनश्री युथ फाऊंडेशन संचलित महाडिक युवाशक्ती शिराळा शहर आयोजित भाजपा जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक यांच्या मार्गदशनाखाली घरगुती गणेश मूर्ती सजावट स्पर्धा उत्साहात पार पडल्या.

या स्पर्धेचे बक्षीस वितरण नगर-सेवक व संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष केदार नलावडे यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेसाठी अनेक घरगुती गणेश मूर्ती सजावट भक्तांनी सहभाग घेतला होता या स्पर्धेला गणेश भक्तांच्या कडून चांगला प्रतिसाद मिळाला. अध्यात्मिक चळवळ टिकावी व त्याला चालना मिळावी हा या स्पर्धेचा उद्देश होता.

या स्पर्धेचे संयोजन नगरसेवक केदार नलावडे व मित्र परिवारातर्फे करण्यात आले होते.



या कार्यक्रम प्रसंगी सुदाम गायकवाडसर ,विजय पाटील रामभाऊ जाधव , प्रा.आशिष पारेख, प्रा.चेतन शहा, प्रा.विकास पाटील, प्रा.अमोल पाटील ,हारुण शेख, राहुल खबाले, सौरभ नलावडे, वैभव इंगवले ,चेतन शिंत्रे ,अजित कुंभार ,अमित माने,राज पाटील, अभिषेक हासबणीस,सचिन दिवटे, झाकीर दिवान,ऋषीकेश गोसावी,ऋषी खुर्दे व महाडीक युवा शक्तीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

**स्पर्धेचे मानकरी**

प्रथम क्रमांक- अनिरुद्ध नलावडे
द्वितीय क्रमांक- कोमल पाटील
तृतीय क्रमांक-धैर्यशील पाटील
चतुर्थ क्रमांक - मनोज काटकर
पाचवा क्रमांक- विनायक नलवडे



# महाराष्ट्राच्या राजकारणात बाळासाहेब थोरातांचा दबदबा कायम

**कोपरगांव : विनोद जवरे**

काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा माजी म हसूलमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांचा राज्यातील सर्वच पक्षांमध्ये मोठा आदर असून, महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक व सहकार क्षेत्रात त्यांचा प्रभाव व दबदबा आजही कायम आहे, हे अलीकडील घडामोडींमधून स्पष्ट झाले आहे. नुकत्याच झालेल्या बैठकीत त्यांनी महाविकास आघाडीला विरोधी पक्षनेतेपद मिळावे,

यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन महत्त्वपूर्ण चर्चा केली.१९८५ पासून संगमनेर विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना 'दुष्काळी तालुका ते विकसित तालुका' असा संगमनेरचा प्रवास घडवून आणण्याचे ऐतिहासिक कार्य बाळासाहेब थोरात यांनी केले.

विविध पायाभूत विकास योजनांद्वारे संगमनेरचा चेहराम ेहरा बदलत त्यांनी संपूर्ण राज्यात एक आदर्श निर्माण केला.माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या कार्यकाळात नाशिक-पुणे राष्ट्रीय महामार्गाचे सुसज्जीकरण, निळवंडे धरण व कालवा योजना, संगमनेर शहरासाठी थेट पाईपलाईन योजना, हायटेक बसस्थानक, पंचायत समिती, नगरपालिका, प्रांत कार्यालय, तहसील कार्यालय, शासकीय विश्राम गृह, भव्य क्रीडा संकुल अशा अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्पांची यशस्वी अंमलबजावणी झाली. संगमनेरच्या मानबिंदू असलेल्या कवी अनंत फंदी खुल्या नाट्यगृहाचे कामही अंतिम टप्प्यात असून, या प्रकल्पामुळे

मविआ ला विरोधी पक्षनेतेपद मिळवण्यासाठी फडणवीस, उद्धव ठाकरे यांची भेट



शहराच्या सांस्कृतिक क्षेत्रात नवा अध्याय लिहिला जाईल. संपूर्ण तालुक्यातील १७१ गावे व २५८ वाड्या याठिकाणी सातत्याने विकास योजना राबवत संगमनेरला ग्रामीण विकासाच्या आदर्श पातळीवर पोहोचविण्यात आले. तालुक्यातून दररोज सात लाख लिटर दूध उत्पादन, १३ लाख अंड्यांचे उत्पादन, तर फळबागा व कृषी क्षेत्रात संगमनेरने राज्यात आघाडी घेतली आहे. तसेच, गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे संगमनेर हे प्रमुख केंद्र म्हणून राज्यभर ओळखले जाते.

राज्यातील विरोधी पक्ष व काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वात बाळासाहेब थोरात यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीच्या पहिल्या २१ सदस्यांमध्ये थोरात यांचे स्थान आहे. त्यामुळे त्यांचा सन्मान केवळ राज्यापुरता मर्यादित नसून, राष्ट्रीय पातळीवरही महत्त्वपूर्ण आहे. महाविकास आघाडीला विधानसभा व विधान परिषदेतील विरोधी पक्षनेतेपद मिळावे, यासाठी बाळासाहेब थोरात यांनी अलीकडेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, विधानसभा सभापती मिलिंद नार्वेकर व विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे यांची भेट घेतली.

या चर्चेत विधिमंडळ गटनेते विजय वडेट्टीवार व उपनेते अमीन पटेल उपस्थित होते. या बैठकीला सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचे समजते.

### सातत्याने जनतेसाठी कार्यरत

फक्त निवडणुकीपुरते नाही, तर दररोज सकाळी सात वाजल्यापासून रात्री अकरा वाजेपर्यंत जनतेच्या सेवेसाठी तत्पर असणारे बाळासाहेब थोरात हे संगमनेर तालुक्यातील नागरिकांच्या मनात घर करून आहेत.वाडी-वस्त्यांवरील जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी ते सतत उपस्थित राहतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली काँग्रेस पक्षाच्या विविध अभियानांचे महाराष्ट्रभर दौरे सुरू आहेत.

### राजकारणात थोरातांचा दबदबा कायम...

दररोज संगमनेर तालुका व जिल्ह्यातील नागरिक मोठ्या संख्येने त्यांच्या संपर्कासाठी येत असतात, हीच गोष्ट त्यांच्या कार्यपद्धतीचे व लोकप्रियतेचे द्योतक आहे. राज्यातील राजकीय घडामोडींमध्ये आणि विकासाच्या वाटचालीत बाळासाहेब थोरात यांचे वजन आजही कायम असून, त्यांच्या नेतृत्वाचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो.

# गरज ही शोधाची जननी आहे : महेंद्रकुमार काले



**कोपरगाव : हॅलो प्रभात**

जगात स्पर्धा ही प्रचंड वाढलेली आहे. आज जगात कौशल्याला अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामूळे आपल्या कौशल्याचा विकास करा, असे प्रतिपादन महाविद्यालय विकास समितीचे सदस्य मा. महेंद्रकुमार काले यांनी केले. ते एस.एस.जी.एम. महाविद्यालयातील 'संशोधन आणि विकास समिती' व 'अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'आविष्कार संशोधन' उद्घाटन कार्यक्रमात बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांनी भूषविले. सदर स्पर्धेसाठी ८६ स्पर्धकांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदविला. महेंद्रकुमार काले यांनी आपल्या मनोगतात,जग हे वेगाने बदलते आहे, त्यात आपला सहभाग असावा, डोक्यातील कल्पना या आविष्काराच्या निमित्ताने व्यक्त होत असतात. म हाविद्यालयातील ज्ञानाची शिदोरी आयुष्यभर उपयोगी पडत असते. म्हणून महाविद्यालयीन जीवनात हे ज्ञान अत्यंत महत्त्वाचे असते. असे सांगितले. बहिस्थ परीक्षक डॉ. सूर्यवंशी यांनी, संशोधनात कल्पना महत्त्वाची असून जी समाजाची समस्या सोडवू शकते,अशा सर्व कल्पनांचा समावेश संशोधनात होतो आहे.हे स्पष्ट केले. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांनी, संशोधन वृत्ती, स्पर्धा परीक्षा, उद्योजकता विद्यार्थ्यामध्ये रुजवावी. विद्यार्थ्यांच्या कल्पनांना जागतिक स्तरावर नेण्याचे कार्य महाविद्यालय करते आहे. हा आविष्कार स्पर्धेचा हेतू आहे, असे सूचित केले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक, पाहुण्यांचा परिचय डॉ.विलास गाडे यांनी करून दिला. प्रस्तुत कार्यक्रमासाठी परीक्षक म्हणून लाभलेले डॉ.शरद शेळके, डॉ. योगिता रांधवणे, प्रा. अनिकेत खत्री, प्रा. के.एस. पोपेरे, प्रा.व्ही.जे. सूर्यवंशी, डॉ. माधव यशवंत, डॉ. अर्जुन भागवत, डॉ. नामदेव आडमुठे, डॉ.प्रतिभा रांधवणे, प्रा. मोहनसिंह पाडवी, विज्ञान विभागाचे उपप्राचार्य डॉ. घनश्याम भगत यांसह संशोधन कमिटीतील सर्व सदस्य, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, स्पर्धेतील विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सीमा दाभाडे व प्रा.प्रियांका पवार यांनी केले. तर आभार डॉ.निलेश मालपुरे यांनी मानले.

# 'जनसुरक्षा कायद्या' विरोधात दौंडमध्ये मविआचे आंदोलन



**दौंड : हॅलो प्रभात**

सरकारच्या विरोधात बोलणाऱ्या सामान्य नागरिकांना आणि कार्यकर्त्यांना दडपशाहीने अटक करण्याच्या तरतुदी असलेल्या 'जनसुरक्षा कायद्या' विरोधात दौंड शहरात तीव्र असंतोष व्यक्त करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ( शरदचंद्र पवार गट ), शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ), काँग्रेस, आम आदमी पार्टी आणि लोकजनशक्ती पक्षाच्या वतीने बुधवारी, १० सप्टेंबर रोजी संविधान स्तंभासमोर जोरदार निषेध आंदोलन करण्यात आले. या प्रस्तावित विधेयकाम ुळे लोकशाही धोक्यात येत असून, नागरिकांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य हिरावले जाण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. आंदोलकांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, या कायद्याचा वापर राजकीय विरोधकांचा आवाज दाबण्यासाठी केला जाईल. त्यामुळे हे विधेयक तत्काळ मागे घेण्यात यावे.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट), दौंड तालुका अध्यक्ष आप्पासाहेब पवार, अनिल सोनवणे, उपजिल्हा प्रमुख शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) हरेष ओझा दौंड शहर प्रमुख काँग्रेस, रविंद्र जाधव तालुका अध्यक्ष आम आदमी पार्टी आणि लोकजनशक्तीपक्षांचे प्रमुख नेते सचिन गायकवाड दौंड शहर अध्यक्ष, मनिषा सोनवणे, सचिन काळभोर, चैतन्य पाटोळे, अमित पवार, दिपक पारदासणी व कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत सरकारच्या धोरणांचा निषेध केला, आंदोलनानंतर या सर्व पक्षांच्या वतीने दौंड पोलीस स्टेशन व तहसीलदार दौंड यांना निषेध नोंदवणारे निवेदन सादर करण्यात आले.

# शिक्षकांचा सन्मान म्हणजे संस्कृतीचा सन्मान : बाळासाहेब गव्हाणे

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

संपूर्ण जिल्ह्यात शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात नावलौकिक असलेल्या के.बी.रोहमारे कनिष्ठ महाविद्यालयात ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म दिवस संपूर्ण भारतभर शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. याप्रसंगी कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अशोकराव रोहमारे तसेच जवळके परिसराचे आरोग्यदुत बाळासाहेब गव्हाणे यांनी सर्व शिक्षक-शिक्षिका, विद्यार्थी व पालक यांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी इयत्ता

के.बी.रोहमारे कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात



१२ वी चे विद्यार्थी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांच्या भूमिकेत जाऊन विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शिकवण्याचा आनंद घेतला. प्रमुख पाहुणे आरोग्यदुत बाळासाहेब गव्हाणे व सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब राहाणे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या कार्यक्रमात सर्व शिक्षक शिक्षिकांना विद्यार्थी शिक्षकांच्या हस्ते भेटवस्तू व गुलाब पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी आरोग्यदुत बाळासाहेब गव्हाणे यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला.

यावेळी संबोधित करतांना बाळासाहेब गव्हाणे यांनी विद्यार्थ्यांना उद्याचे सुजाण, सुसंस्कृत नागरिक होण्यासाठी आवश्यक बदल अंगीकृत करण्याचे आवाहन केले. यावेळी विद्यार्थीनी प्राचार्य सानिया सय्यद , शिक्षक झालेले व कावेरी गोरडे , प्राजक्ता बोरसे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विद्यार्थीनी सृष्टी पाचोरे हिने केले तर आभार विद्यार्थिनी समीक्षा झिंजुर्डे हिने मानले.

# बिबट्यांची नसबंदी करा अन्यथा सर्वांना भविष्यात धोका : विवेक कोल्हे



**कोपरगाव : हॅलो प्रभात**

कोपरगाव मतदारसंघात वाढत्या बिबट्यांच्या संख्येमुळे नागरिकांचे तसेच पाळीव जनावरांचे प्राण धोक्यात आले आहेत. अलिकडच्या काळात अनेक ठिकाणी बिबट्यांचे हल्ले घडून नागरिकांना गंभीर दुखापती झाल्या असून पशुधनाचेही मोठे नुकसान झाले आहे. या वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना करणे अत्यावश्यक बनले आहे.या संदर्भात कोल्हे कारखाना अध्यक्ष विवेक कोल्हे यांनी शासनाकडे महत्त्वपूर्ण मागणी केली आहे. बिबट्यांची संख्या नियंत्रित रहावी व त्यांची शहरी वस्तीमध्ये वावरण्याचा धोका कमी व्हावा यासाठी बिबट्यांची वैज्ञानिक पद्धतीने नसबंदी करण्याची मोहीम राबविणे हा योग्य व दीर्घकालीन उपाय असल्याचे कोल्हे यांनी सांगितले.कोल्हे पुढे म्हणाले की, सध्या नागरिक भागात फिरणाऱ्या व जंगलातील बिबट्यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवले गेले नाही तर नागरी भागात त्यांची उपस्थिती वाढत जाईल व त्यामुळे आणखी अपघात, हल्ले व नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होईल. शासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन वनविभाग, प्राणीवैद्यकीय विभाग व स्थानिक प्रशासन यांच्या माध्यमातून संयुक्त मोहीम राबवावी. यासह वनविभाच्या अंतर्गत मनुष्यबळ कमतरता असून पिंजऱ्यांची संख्या देखील पुरेशी नाही त्यातही वाढ करून आवश्यक ती पूर्तता होण्याची गरज आहे.नागरिकांच्या जीविताचे रक्षण व जनावरांच्या सुरक्षिततेसाठी ही मोहीम काळाची गरज असून शासनाने तातडीने यावर निर्णय घ्यावा, अशी मागणी कोल्हे यांनी केली आहे.

# राहुरीत तुळजाभवानी पालखीचे प्रस्थान

**राहुरी : हॅलो प्रभात**

शहरातील जंगम गल्ली येथील तुळजाभवानी मंदिरात ८ सप्टेंबर सकाळी बाजार समितीचे सभापती अरुण तनपूरे, माजी नगराध्यक्षा उषाताई तनपूरे, राहुरी साखर कारखान्याचे संचालक हर्ष तनपूरे, माजी मंत्री प्राजक्त तनपूरे यांच्या पत्नी सोनालीताई तनपुरे, सोहम तनपूरे यांच्या हस्ते आरती करुन पालखीचे प्रस्थान करण्यात आले. राहुरीची माहेरवाशीन आई तुळजाभवानी देवीच्या पालखीची आज दि. ८ सप्टेंबर २०२५ रोजी शहरातील तुळजाभवानी मंदिरात पालखीची खणा नारळाने ओटी भरवून पालखीला शिवाजी चौक परिसरात खेळविण्यात आले. मानकरी असलेल्या अण्णासाहेब शेटे, सुरेश धोत्रे यांच्या घरासमोर आरती करण्यात आली. त्यानंतर श्रीरामदत्त मित्र मंडळ, शिवाजी



चौक तरुण मंडळाचे कार्यकर्ते व परिसरातील भाविकांनी पालखीला खांद्यावर खेळवीले. यावेळी भंडाऱ्याची उधळण करत आई राजा उदो उदो या घोषनांनी परिसर दणाणून गेला होता. गोरख तांबोळी यांच्या कुटुंबाच्या वतीने पानाचा विडा देऊन पालखी पुष्पहारांनी सजवलेल्या ट्रॉलीमध्ये ठेवण्यात आली. त्यानंतर पालखीला शहरातील शिवाजी चौक, जुनीपेठ, शुक्लेश्वर चौक, कासार गल्ली, मेन रोड, आझाद चौक, शनीचौक, नवीपेठ, स्टेशन रोड, कानिफनाथ चौक, क्रांती चौक, सोनार गल्ली मार्गे कोळीवाडा अशा विविध भागात मिरवण्यात आले. प्रसंगी भावीक भक्तांनी पालखीची खणा नारळाने ओटी भरून दर्शन घेतले. सायंकाळी गणपती घाट येथे सुनिल पवार यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या उत्साहात पालखीला डिजेच्या तालावर खेळविण्यात आले. त्यानंतर तुळजापूर येथील नवरात्र उत्सवासाठी पालखीला जड अंतकरणाने तुळजापूरकडे रवाना करण्यात आले. मुळानदी तुडूंब भरून वाहत असल्याने पालखीला पाण्यातून देसवंडी मार्गे रवाना करण्यात आले. यावेळी अनेक भावीकांच्या डोळ्यात अश्रू तरळले होते. यावेळी ताराचंद तनपूरे, अनिल कासार सागर तनपूरे, आसाराम शेजूळ, नंदुभाऊ तनपूरे, गजानन सातभाई, पांडूभाऊ उदावंत, अशोक आहेर, दिपक साळवे, शिवाजी डौले, प्रतिक तनपूरे, संजय पन्हाळे, गोपी दहिवाळकर, स्वप्नील ढवळे, अर्जुन बुऱ्हाडे, सौरभ उंडे, संजीव उदावंत, दिपक नागरे, राजू बुऱ्हाडे, किशोर इंगळे, दत्तात्रय सोनवणे, अजय इंगळे, भोला लोखंडे, संदीप सोनवणे, संतोष नागरे, य फंड आदि भावीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षण सेवक सोसायटीच्या चेअरमन पदी राजेंद्र खांडेकर



व्हा.चेअरमन पदी संतोष वाटवे; सागर वनखंडे यांच्याकडून अभिनंदन

**सांगली : हॅलो प्रभात**

येथील शिक्षण सेवक सहकारी सोसायटी लिमिटेडच्या चेअरमन पदी राजेंद्र खांडेकर व व्हाईस चेअरमन पदी संतोष वाटवे यांची निवड झाल्याबद्दल युवा नेते सागर वनखंडे यांनी अभिनंदन केले.

याप्रसंगी मोहन शिंदे, लक्ष्मण साळेव संस्थेचे संचालक व कर्मचारी उपस्थित होते.

# एस.टी.ठेकेदार,आधिकाऱ्यांची तनपुरे यांच्याकडुन कान उघडणी

**राहुरी : हॅलो प्रभात**

राहुरी येथील ५ कोटी रुपये खर्चाच्या बस स्थानकाचे बांधकाम ाची मुदत संपत आलेली असतानाही स्थानकाचे काम अतिशय धिमे गतीने सुरु असून स्थानकाचे काम ४०/४५ टक्केच झाल्याने माजी खासदार प्रसाद तनपुरे यांनी खंत व्यक्त केली .यावेळी त्यांनी बस स्थानकाचे कामाची पाहणी केली असता त्यांनी ठेकेदार,एस टी च्या अधिकारी यांना फोनवरून कान उघडणी केली. संथ गतीने काम चालल्यास बस स्थानकाचे काम पूर्ण होण्यास २०२७ उजाडेल तेव्हा सदर कामास गती देण्याची मागणी अधिकारी ठेकेदार यांना केली.माजी खासदार प्रसाद तनपुरे राहुरी बस स्थानकाच्या प्रश्नावर सुरवाती पासून लक्ष ठेऊन असून अगदी जुन्या बस स्थानकाच्या जीर्ण झालेल्या इमारती पासून ते नवीन बांधकामास मंजूर आणे पर्यत सतत ते विचारपूस करून बांधकाम करताना कोणतीही अडचण येई नये काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे अशी त्यांची अपेक्षा असताना ही अपेक्षा फोल ठरत गेल्याने त्यांनी राहुरी बस स्थानकाचा प्लॅन ज्यांनी तयार केला ते वास्तुविशारद (आर्किटेक्चर ) देवगावकर यांचेशी चर्चा केली असता त्यांनीही सदर काम अतिशय संथ गतीने चालल्याचे सांगितले.एस टी चे वरिष्ठ अधिकारी या कामाबाबत कुठलेही सहकार्य करीत नसल्याची खंत प्रसाद तनपुरे यांनी व्यक्त केली. एस टी च्या बांधकाम विभागाच्या अभियंता वाघ यांचेशी तनपुरे यांनी संपर्क केला असता त्यांनी सदर कामाची मुदत ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत आहे. सदर स्थानकाच्या कामाचे ठेकेदार,अभियंता कधीही भेटत नसल्याची तक्रार एस टी च्या बांधकाम अभियंता वाघ यांनीही केली काम अतिशय धिमे गतीने सुरु असल्याच्या गोष्टीसाठी दुजोरा दिला.अद्याप या स्थानकाचे काम फक्त ४०/४५ टक्केच झाले .

# रसायनशास्त्राचे विद्यार्थी सशस्त्र दलात भविष्य घडवू शकतात : सागर पार्टे

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

विज्ञान शाखेतील पदवीधर आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना भारतीय सैन्य, नौदल आणि हवाई दलात सेवा करण्याच्या खूप संधी आहेत असे प्रतिपादन भारतीय हवाई दलाचे कॉर्पोरल सागर पार्टे यांनी केले. जनता शिक्षण संस्थेच्या किसन वीर महाविद्यालयामध्ये रसायनशास्त्र विभागाच्यावतीने आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे होते. याप्रसंगी रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा. (डॉ.) ज्ञानदेव झांबरे, प्रा.दिपाली पाटील, डॉ.संदीप वाटेगावकर व इतर प्राध्यापक उपस्थित होते.

पार्टे पुढे म्हणाले, लष्कर, नौदल आणि हवाई दलाला शूर सैनिकांसोबत संशोधन, नवोपक्रम आणि शिक्षणाद्वारे योगदान देऊ शकतील अशा विज्ञान क्षेत्रातील हुशार मनांची देखील आवश्यकता आहे. यासाठी सशस्त्र दलातील करिअर ही केवळ नोकरी नाही, ती राष्ट्रसेवा आहे. ही संधी आपणास आदर, शिस्त, साहस आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, भारताच्या सुरक्षेत आणि प्रगतीत तुम्ही योगदान देत आहात याचे



समाधान देते असे बोलून त्यांनी विद्यार्थ्यांना सशस्त्र दलाच्या विविध स्पर्धा परीक्षांची माहिती दिली.अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना डॉ. गुरुनाथ फगरे म्हणाले ' विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करून वाटचाल करायला हवी. परिश्रम, शिस्त आणि दृढनिश्चय या गोष्टीच माणसाला यशापर्यंत नेतात. विज्ञान विभाग विशेषतः रसायनशास्त्राची व्याप्ती केवळ प्रयोगशाळा आणि वर्गखोल्यांपुरती मर्यादित नाही; ती संरक्षण संशोधन, ऊर्जा, इंधन, स्फोटके, आणि पर्यावरणीय सुरक्षा यासारख्या क्षेत्रांमध्ये पसरली आहे. सशस्त्र दलातील करिअर आव्हान नसून आपल्या राष्ट्राप्रती सेवा देण्याची मोठी संधी आहे.

आपल्या प्रास्ताविकात, प्रा. (डॉ.) झांबरे यांनी विद्यार्थ्यांच्या हितासाठी अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. व्याख्यानाचा उद्देश रसायनशास्त्राच्या विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन व्यापक करणे आणि त्यांना शैक्षणिक आणि उद्योगाच्या पलीकडे, विशेषतः संरक्षण आणि राष्ट्रीय सेवेच्या क्षेत्रात, संधींची जाणीव करून देणे हा होता यावर त्यांनी भर दिला.

पाहुण्यांचा परिचय डॉ. संदीप वाटेगावकर यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.निकिता सुर्वे आणि प्रा.प्रियांका जाधव यांनी केले तर आभार प्रा.सोमनाथ सानप यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.राजेश्वरी कामटे, प्रा.ऋतुजा भोईटे, प्रा.अजित पांढरे, प्रा.धनश्री शिर्के, प्रा.मयुरी सावंत, महाविद्यालय विकास समिती सदस्य श्री. अनिल सावंत, चेतन तावरे आदींनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# व्यवसायिकांसाठी खुशखबर

सांगली, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, पुणे,
अहमदनगर सह संपूर्ण महाराष्ट्रात
डिजिटलच्या माध्यमातून तब्बल सात लाख वाचकांपर्यंत
पोहोचणाऱ्या दैनिक **हॅलो प्रभात** सोबत
आपल्या व्यवसायाची जाहिरात करण्याची...



## सुवर्णसंधी



| जाहिरात साईज | प्रसिद्धी कालावधी | किंमत |
|---|---|---|
| 08X05 cm | संपूर्ण महिना | ५000/- |
| 08X10 cm | संपूर्ण महिना | ७000/- |
| 12X10 cm | संपूर्ण महिना | १0000/- |

टीप : सदर जाहिरातीचे दर हे फक्त डिजिटल आवृत्तीसाठी लागू आहेत.

**शुभेच्छा जाहीरात, जाहीर नोटीस,
छोट्या जाहीराती, टेंडर नोटीस व सर्व प्रकारच्या
जाहीरात प्रसिद्धीसाठी...**

## एकवेळ अवश्य संपर्क साधा

# दै. हॅलो प्रभात

**फोन : 9094277171 / 9011889001**

• छापील प्रत मिळिवण्यासाठी संपर्क : 9021651976